



# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com






* वर्ष ६५ वे * अंक ३७ * नांदेड * रविवार, दि. ८ फेब्रुवारी २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211


# राज्यातील जि.प. आणि पं.स.साठी ७० ते ७५ टक्के मतदान

## ७ हजार ४३८ उमेदवारांचे भवितव्य मतपेटीत बंद, उद्या निकाल

**मुंबई (प्रतिनिधी)–** मुंबई: राज्यातील १२ जिल्हा परिषदा आणि त्यांतर्गतच्या १२५ पंचायत समित्यांसाठी शनिवारी मतदान यंत्र बंद पडणे, वादावादीच्या किरकोळ घटनांचा अपवाद वगळता शांततेत ७० ते ७५ टक्के इतके भरघोस मतदान झाले. सोलापूर आणि छत्रपती संभाजीनगरमध्ये लहान मुलांना मतदान यंत्रापर्यंत जाऊ देण्यात आल्याच्या घटनेची निवडणूक आयोगाने गंभीर दखल घेत सबंधितांवर कठोर कारवाईचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत. या निवडणुकीची सोमवारी मतमोजणी होणार आहे.

राज्यातील ५० टक्के आरक्षणाच्या मर्यादेत असलेल्या रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, परभणी, धाराशिव आणि लातूर या १२ जिल्हा परिषदा आणि त्यांतर्गतच्या १२५ पंचायत समित्यामध्ये शनिवारी मतदान पार पडले. महापालिकांच्या तुलनेत जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांसाठी आज मतदारांमध्ये प्रचंड उत्साह दिसून आला. सकाळपासूनच अनेक ठिकाणी मतदान केंद्रावर मतदारांच्या रांगा लागल्या होत्या. रत्नागिरी जिह्यातील चिपळूण तालुक्यात काही ठिकाणी मतदान यंत्र (ईव्हीएम) बंद पडण्याच्या घटना घडल्या. आणखी काही जिह्यात मतदान यंत्रात बिघाड झाल्याच्या तक्रारी करण्यात आल्या. मात्र मतदान यंत्र दुरुस्त करून लगेच मतदान सुरु करण्यात आले.

### परभणीमध्ये मतदान केंद्रावर वाद

परभणी येथील राणीसावरगावमध्ये काही महंतांना मतदान करण्यापासून रोखल्यामुळे मतदान केंद्रावर वाद निर्माण झाला. महंतांनी थेट अधिकाऱ्यावर भाजपची दलाली करण्याचा आरोप केला. पोलिसांनी मध्यस्थी केली, मात्र वाद सुरु राहिला. अखेर महंतांनी मतदान न करताच मतदान केंद्र सोडले.

### कोल्हापुरात दोन गटांत बाचाबाची

कोल्हापूरच्या राधानगरी तालुक्यात राशिवडे येथील ग्रामपंचायत केंद्रावर वयस्कर मतदारांना मतदानासाठी नेण्यावरुन दोन गटात किरकोळ बाचाबाची झाली. या वेळी दोन्ही गटांच्या जमावाने परिस्थिती तणावपूर्ण केली, मात्र पोलिसांनी हस्तक्षेप करून दोन्ही गटांचे नियंत्रणात आणले.

### खेडमध्ये राष्ट्रवादी नेत्यावर हल्ला

पुण्याच्या खेड तालुक्यात मतदानाच्या दिवशी आंबेठाण-पाईट गटात राजकीय वैमनस्यातून हिंसाचार झाला. राष्ट्रवादी काँग्रेसच्या अधिकृत उमेदवार सुनिता बुट्टे यांचे पती आणि माजी जिल्हा परिषद सदस्य शरद बुट्टे पाटील यांच्यावर अज्ञातांनी प्राणघातक हल्ला केला. या हल्ल्यात बुट्टे पाटील गंभीर जखमी झाले असून, त्यांच्यावर वासुली फाटा येथील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

# टी-२० विश्वचषक: वेस्ट इंडिजची विजयी सलामी

**कोलकाता (प्रतिनिधी)–** दोन वेळच्या विश्वविजेत्या वेस्ट इंडिज संघाने आपल्या टी-२० विश्वचषक २०२६ मोहिमेची दणक्यात सुरुवात केली आहे. कोलकाता येथील ऐतिहासिक ईडन गार्डन्स मैदानावर झालेल्या सामन्यात कॅरेबियन संघाने स्कॉटलंडवर ३५ धावांनी मात करत दोन गुण वसूल केले. या विजयात अष्टपैलू रोमारियो शेफर्ड आणि स्फोटक फलंदाज शिमरॉन हेटमायर विजयाचे शिल्पकार ठरले.

नाणेफेक हारल्यानंतर प्रथम फलंदाजी करताना वेस्ट इंडीजची सुरुवात खराब झाली होती. मात्र, मधल्या फळीत आलेल्या शिमरॉन हेटमायरने आक्रमक फटकेबाजी करत डावाला गती दिली. त्याने स्कॉटिश गोलंदाजांचा समाचार घेत महत्त्वपूर्ण अर्धशतकी खेळी केली.

# राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाची सूत्रे आता सुनेत्रा पवारांच्या हाती



**मुंबई (प्रतिनिधी)–** राष्ट्रवादी काँग्रेसच्या संभाव्य विलीनीकरणाबाबत सुरू असलेल्या चर्चांना आता निर्णायक वळण मिळाले असून, या प्रक्रियेची सूत्रे थेट सुनेत्रा पवार यांनी हाती घेतली आहेत. पवार कुटुंबीयांमध्ये झालेल्या चर्चेनंतर, सुनेत्रा पवार जो निर्णय घेतील तोच अंतिम मानला जाईल आणि तो निर्णय नेते व पदाधिकारी स्वीकारतील, असे ठरल्याची माहिती राष्ट्रवादीतील एका वरिष्ठ नेत्याने दिली. वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ यांनीही तसे संकेत दिले आहेत.

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अकाली निधनानंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे भवितव्य, नेतृत्व आणि दोन्ही गट एकत्र येण्याची शक्यता यावर राज्याच्या राजकारणात जोरदार चर्चा सुरू आहेत. विलीनीकरणाबाबत अद्याप ठोस निर्णय जाहीर झालेला नसला तरी, विविध पातळ्यांवरून दावे-प्रतिदावे होत आहेत. याच पार्श्वभूमीवर बारामती येथे पवार कुटुंबीयांमध्ये सलग चार दिवस बैठकांचे सत्र पार पडले. या बैठकांमध्ये शरद पवार स्वतः सहभागी झाल्याने, विलीनीकरणाबाबत काही ठोस निर्णय होणार का, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले होते. या चर्चांनंतर अजित पवारांच्या पश्चात विलीनीकरणासंदर्भातील निर्णयाधिकार सुनेत्रा पवार यांच्याकडे देण्यात आल्याची माहिती पुढे आली आहे.

यासंदर्भात हसन मुश्रीफ म्हणाले की, अजित पवार यांच्या पातळीवर काही चर्चा सुरू असतील, तर त्याची माहिती आम्हाला नाही. मात्र, पवार कुटुंबाची आणि विशेषतः सुनेत्रा पवार यांची भूमिका विलीनीकरणाच्या दृष्टीने निर्णायक ठरणार आहे. सुनेत्रा पवार यांनी विलीनीकरणाचा निर्णय घेतला, तर तो आम्हाला मान्य करावाच लागेल, असे त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या वक्तव्यामुळे विलीनीकरणाच्या चर्चांना अधिक धार मिळाली आहे. पत्रकारांशी बोलताना तटकरे म्हणाले की, आम्ही सर्वांनी मिळून अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली एनडीएमध्ये जाण्याचा निर्णय घेतला होता. विलीनीकरणाचा विषय सखोलपणे चर्चिला जाईल. १० फेब्रुवारी रोजी होणाऱ्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीला उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार उपस्थित राहणार असून, त्या वेळी त्यांच्याशी विलीनीकरणाबाबत चर्चा केली जाईल, असे त्यांनी सांगितले.

# टी-२० विश्वचषकाचा शंखनाद! सुर्यकुमारच्या खेळीमुळे वानखेडेवर टीम इंडियाची विजयी गर्जना

**मुंबई (प्रतिनिधी)–** आयसीसी टी-२० विश्वचषकाचा बिगुल शनिवारी वाजला आणि पहिल्याच सामन्यात टीम इंडियाने आपल्या घरच्या मैदानावर म्हणजेच वानखेडे स्टेडियमवर विजय मिळवला. सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखाली खेळणाऱ्या भारतीय संघाने अमेरिकेचा २९ धावांनी पराभव करत स्पर्धेत विजयी सलामी दिली आहे. भारताने दिलेल्या १६१ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना अमेरिकेचा संघ निर्धारित षटकांत १३२ धावांपर्यंतच मजल मारू शकला. यासह भारताने या स्पर्धेतील आपले पहिले दोन गुण खात्यात जमा केले.

नाणेफेक हरल्यानंतर प्रथम फलंदाजी करताना भारतीय संघाने ९ विकेट्सच्या मोबदल्यात १६१ धावा केल्या. मात्र, टीम इंडियाची सुरुवात अत्यंत खराब ठरली. सलामीवीर अभिषेक शर्मा पहिल्याच चेंडूवर आऊट झाला. यानंतर ईशान किशन आणि तिलक वर्मा यांनी डाव सावरण्याचा प्रयत्न केला.



**नांदेड :** माता रमाई यांच्या जयंतीनिमित्त शहराच्या विविध भागातून मिरवणुका काढण्यात आल्या. यावेळी नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. (छाया : करणसिंह बैस)

# भाजपवर संघाचा रिमोट कंट्रोल नाही -सरसंघचालक भागवत

**मुंबई (प्रतिनिधी)–** भाजप हा राजकीय पक्ष असून तो राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा (आरएसएस) नाही, भाजपमध्ये संघाचे काही नेते काम करतात आणि ते प्रभावीही आहेत. पण भाजप किंवा विविध क्षेत्रात कार्यरत असलेल्या कार्यकर्त्यांवर संघाचे नियंत्रण किंवा रिमोट कंट्रोल नाही, असे परखड मतप्रदर्शन सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी शनिवारी नेहरु सेंटरमध्ये केले.

भाजपवर संघाचा रिमोट कंट्रोल चालतो, अशा कायम सुरु असलेल्या चर्चांच्या पार्श्वभूमीवर डॉ. भागवत यांनी व्यक्त केलेले मत महत्वाचे आहे. रा.स्व.संघ भाजपपासून सुयोग्य अंतर राखून असल्याचेही निदर्शक आहे. संपूर्ण हिंदू समाज संघटन आणि बलशाली राष्ट्र उभारणी एवढेच संघकार्य असून ते करताना अन्य कामांसाठी कार्यकर्त्यांना फुरसतही नसल्याचे भागवत यांनी स्पष्ट केले आहे.

भागवत यांचे 'संघ प्रवासाची १०० वर्षे, नवे क्षितीज' या विषयावर नेहरु सेंटरमध्ये शनिवारी व्याख्यान झाले. विविध क्षेत्रांमधील मान्यवरांपुढे भागवत यांनी संघाची उद्दिष्टे व कार्याचा प्रवास उलगडून दाखविताना संघाबद्दल असलेल्या समज-गैरसमजांवरही परखडपणे भाष्य केले आहे. संघ समजून घेण्यासाठीचे मापदंड कोणते आणि संघाची कार्यपद्धती काय आहे, हेही त्यांनी समजावून सांगितले.




# रितू तावडे होणार मुंबईच्या महापौर तर संजय घाडी उपमहापौर



**मुंबई (प्रतिनिधी)–** मुंबई मनपाच्या महापौरपदी भाजपकडून रितू तावडे यांच्या नावाची घोषणा करण्यात आली आहे. मुंबई भाजप अध्यक्ष अमित साटम यांनी त्यांच्या नावाची घोषणा केली. मुंबईच्या उपमहापौरपदी शिवसेना शिंदे गटाकडून संजय शंकर घाडी यांच्या नावाची घोषणा करण्यात आली. पुढील सव्वा वर्षांसाठी घाडी उपमहापौर असणार आहेत.

भाजपकडून रितू तावडे आणि शीतल गंभीर यांच्या नावाची सर्वाधिक चर्चा होती, पण रितू तावडे यांनी बाजी मारली. मुंबईचे महापौरपद सर्वसाधारण महिला गटासाठी राखीव आहे. ११ फेब्रुवारी मुंबई मनपा महापौर निवड होणार आहे. रितू तावडे या भाजपच्या मुंबईमधील पहिल्या महिला महापौर असणार आहेत. मुंबईची महापौरपदी निवड झाली असली तरी मुंबईची सेवक म्हणून काम करणार आहे, असे तावडे म्हणाल्या.






# बहुरूपी



काय मावशी काय करून राह्यली.

सुभ्या बोल्ला.

डोये फुटले काय, की ..वले.

असच ईचारल अन् तू मावशे अन् तू चमकादर सारखी ऊल्टी बोल्त.

कायी नाही रे बाबू ऊंब्या घासून् राह्यली इटकरीनं. बाल्याले म्हतलं ऊंब्या इटकरीनं घास त कटाय करते. आयत देल्ल की मूटमूट खाते अयदी भोकाचं. हा रानमेवा हाय ऊंब्या, हुया, बोर, चिचा, कवटं, वान–ीचा गुयचट हुळ्ळा. मंग सालभर लागते काय तोंडाले लेकरानं कस आंगोनीनं खाव.

बाल्याची माय कमला बोलली.

मले ही देजो मावसे ऊल्स तासकीत.

सुभ्या बोल्ला.

काबे सुभ्या लेका पायटीच आला. काय काम काहाळलं बापा पायटी पायटी.

बाल्या बोल्ला.

चला म्हतलं बाल्याच्या घरी सिंगलभर चा प्याव अन् त्याच्या कायी गोष्टीमाष्टी आयकावं.

गोष्टीमाष्टी थ्या रा–तीले असतात. मस्त खावून खुंदलूनं झालं की, शेकोटीवर हातपाय शेकत. पायटी गोष्टी सांगाव त हागमूत, आंघोयपांगय कवा कराव.

तू जाय पटकन नानीत आंघोय करून ये.मी हाव अथीसाच बसून. तस मले अज वावरात जाच काम नाही. बुढा गेला हरबऱ्याच्या सोकारीले पायटीचं.

मंग शिदोरी घेवून जा लागनं नं.

जा यी न तीसरी अजान झाल्यावर.

काय मालूमात पाह्यजे होती तुले सांग. तू किती हटकोर भोकाचा हायस थे फकस्त मलेच ठावूक हाय. तू आयकल्या बगर बापीस कसा जाशीनं.

तुले मालूमात हाय म्हनून लोनी लावाले येतो ब्वा. अन् थ्यात तू एखांद्या पोरीसारखा भाव खातं. आता कसा आला हिंदानावर. अबे मले बहूरूपी म्हनजे काय? त्याच्या ईषयी सांग बरं.

हं ह्या घ्या बे पोट्टे हो चा प्या पयले. दूद नाही थ्यात. कपीली गाबन हाय.

कमला बोल्ली.

मावशी गुयाचा होय काय साखऱ्याचा होय.

बापा लगे साख–याचा पाह्यजेन माजेल गांडीले. ऊगीमुगी प्या गुयाचा व्होय.

मा याच्यात त दूद टाकाच होतं ना.

गायीच दूद बन झालं. गाभन हाय थे. आयकल नाही काय त काय बोल्ली मी की कानात भेंड गेली.

कमला बोल्ली.

दोघही फुटेल कानाच्या कपानं चा पेतात. चल सांग बाल्या लेका पटकन मंग मले विठू–मावली बैलायले चराले न्याच हाय पळीतात.

बापाची शिदोरी न्याची हाय.

चल आईक मंग. बहू म्हनजे अनेक अन् रूपी म्हनजे रूप..अनेक रूप धारन करनारा मानूस म्हनजे बहूरूपी. पयले जुन्या काळात टीबी नोती ना रेडिओ नोता तवा करमनूकीसाठी हे बहूरूपी गावात याचे तेयचा खेय दाखवाचे अन् भेटन थे थ्याच्व्वर गुजरान कराचे.

खेय कोन्चा.

थे नकलाकार असाचे. येगयेगळा आवाज काहाळाचे. कधी पोलिसाचा डेरेस, कधी भिकाऱ्याचा भेस, कधी लुगळ घालून त कधी म्हाताऱ्या मानसाचा भेस बदलून या चे. ते करमनूक त कराचेच थ्याच बराबर थे डोयात काजयही घालाचे. रूढी परथावर आसूळ ओढाचे, गंमत जंमत कराचे. लोकायले हासवाचे अन् लळवाचे ह. थे गावात आले की, अवघ गाव रिंगन धरून ऊबे राहाचे. अन् हा बहूरूपी थ्याची कला सादर करे. लोकं कान टवकारून हासत अन् हासता हासता लळतही.

नेमक कसा हासवाचा थो थे सांगन.

हे पाह्य.... बहुरूपी गावात आला की, घराम्होर येवूनं थो म्हनाचा...चला काकू चला लगनाले चला, सास–याचं लगन हाय. लगनाले चला... लगनाची हवा बॅन्डबाजा लावा.कुतरे घ्या काखीले, लेकरं बांधा दाव्याले. बुडे घा–लती लुगळे, बुढी घाली धोतरं.. लगबग करा काकू लगबग करा.. सास–याच्या लगनात जेवाले काय काय हाय? तुमी कायी ईचारू नोय म्या कायी सांगू नोय. तोंड हाय तोंड मूक बसनार काय कवा.पक्की रसोई हाय. रेतीची बुंदी, शेंबळाची भाजी, झुरय खटमलाचा ठेसा, गाट्याच्या पु–या अन् मिठाचा लाळू हाय. हात बांधून बसाच.पायानं जेवाच. लगन कवा हाय बत्तीस तारखेले तेराव्या मयन्यात पंधरा तारखीले पांढ्या सोमवारी. येतानी अयरात काय काय न्याचं. गोटेमाटे वावरातले ढेकळ न्याव.

काय खबरबात शेयरातली... आजच्या भळक सळक छाप शियापात्या बातम्या. काल राती मच्छरानं म्हशीच चाळीस लिटर दूध पेल्ल म्हनून म्हैस गाबन झाली. काल एका माशीन नदीत आत्महत्या केली. थे पान्यात ईतकी फुगली तरी सतरा लोकायले ऊचलल्या जात नोती. हत्तीवर काल मुंगी बसली हत्ती–ले तीचे वजन पेलवव्या गेल नाही. मुंगीच्या वजनानं हत्ती सत्तर फूट जमिनित घूसला. काल ऊंदराचा राज्याभिषेक झाला. दिमकतीले पन्नास सिंह, चाळीस वाघ होते. काल पासून कुतरे साखळी उपोषनावर बसले. तेयच्या प्रमुख मागन्यापैकी एक मागनी सरकारनं तेयले राष्ट्रीय प्राणि म्हनून लवकरात लवकर घोषित कराव नाहीत खावून पिवून उपोषनाले बसनार, मांजरीन वाघावर दावा ठोकला वाघ आता गावात राह्यनं अन् मांजरी जंगलात. जंगलाचा राजा आज पासून बोक्या राह्यनार हाय. काल बकरीनं वाघाच्या दोन बछड्याले जल्म देल्ला. तेराव्या मयन्यात भर ऊन्हायात पानी पळनं असा हवामान खात्यानं अंदाज वर्तवला हाय. गध्यायनं राजकारनात पावूल ठुयलं हाय. तेयचे सतराशे छप्पन आमदार निवळून आले हायेत.कावळ्यानं महाराष्ट्र शासन राजपत्रानुसार सोताचं कावळा नाव बदलवूनं मिठ्ठू हू नाव ठुयल हाय. मासोया ऊपोषनाले बसल्या असूनं कोयानं संतरंजी मांडवाची सोय गावठानावर केली हाय.

जंगली काया रंगाच्या सश्यानं कवीवर मुकदमा कोर्टात ठोकला कारण कवीनं आम्चा रंग काया तरी ससा ससा दिसतोस कसा कापूस पिंजून ठुयला जसा असी कवीता लेयली हाय.जमिनीत आंबे लागले, रताय, गांजर, काकळी, कांदा, लसन पिपयावर लागले. बाबूयीच्या झाळाले मोठमोठे टरबुज लागले होते. वारवावदानं आलं एक टरबूज खाली पळ्ळ लाल व काया रंगाची मुंगी गंभीर जखमी झाली असूनं अकोल्याच्या नामांकित हटेलात ऊपचारासाठी दाखल.एक माकोळा अन् एका मानसात दोहि खटात जोरदार मारहाण. मारहाणीत मानसाचा दारूनं मृत्यू. अस बोल–ते लेका सुभ्या बहुरूपी. पन् आता बहुरूपी लोककला लुप्त होन्याच्या वाटेवर हाय.

काय साजरी मालूमात देल्ली लेका बाल्या मले लैच गमल लेका. चल जातो लेका घरी आता.

–सु. पुं. अढाऊकर
अकोला
मो.९७६९२०२५९७


# अव्यक्त वेदनांचा 'अंत:स्वर' म्हणजे : 'अनाहत'

पुस्तक परिचय
बाबाराव विश्वकर्मा
नांदेड
मो. ९४०३४१८७१८

मराठी साहित्य क्षेत्रात अलीकडे खूप मोठ्या प्रमाणात कवितांचे मळे फुलत आहेत. वसंत ऋतूत सृष्टीच्या अंगोपांगी नवउन्मेष लगडून यावा असे आज कवितेचे झालेले आहे. मराठी वाययातील कविता सर्वस्थळी बहरत असतांना काही मोजक्या कवींची कविता मात्र सर्वदूर दरवळत आहे. त्यातील आघाडीचे एक महत्त्वाचे कवी म्हणजे व्यंकटेश चौधरी हे आहेत.

व्यंकटेश चौधरी म्हणजे, शिक्षण, साहित्य व सांस्कृतिक क्षेत्रातील एक अष्टपैलू व्यक्तिमत्त्व आहे. त्यांनी शिक्षणक्षेत्रातील उपक्रमशील कार्यशीलतेने नांदेड जिल्हा परिषद असो की शिक्षणाधिकारी महानगरपालिका नांदेड या दोन्ही ठिकाणी त्यांनी आपल्या स्वतंत्र भूमिकेने एक वेगळेपण सिद्ध केलेले आहे. प्रदीर्घ प्रशासकीय सेवेतून निवृत्त झाल्यावर त्यांनी सामाजिक क्षेत्रातील वंचित बहुजन व एकल, परित्यक्त महिला पुनर्वसन, अनाथ मुलां–मुलींसाठी समुपदेशन, सहकार्य करून आपली सामाजिक संवेदनशीलता व कर्तव्यभावना जपलेली आहे. समाजातील शेतकरी, कष्टकरी, महिला, मजूर, कामगार यांच्याविषयीची तळमळ त्यांच्या वेळोवेळी प्रकाशित झालेल्या साहित्यातून अभिव्यक्त होत गेलेली आहे. त्यांचे व्यक्तिमत्त्व जसे विलोभनीय व विविधांगी आहे तसे, त्यांचे साहित्यसुद्धा विविधांगी अनुभवांनी चितारलेल्या इंद्रधनुष्याप्रमाणे सर्वांगसुंदर आहे.

व्यंकटेश चौधरी यांचा 'गंधबन' हा पहिला कवितासंग्रह असून नंतर 'एक शून्य प्रतिक्रिया' हा त्यांचा दुसरा काव्यसंग्रह होय. शिक्षणक्षेत्रात कार्यरत असतांना शिक्षकांमध्ये वाचन व लेखनाची आवड निर्माण व्हावी व त्यांना विचार अभिव्यक्त करता यावे यासाठी त्यांनी 'पळस' नावाचे प्रातिनिधिक काव्यसंग्रहाचे संपादन करून प्रकाशित केले. लोकसंवाद ग्रामीण साहित्य संमेलनाचे संयोजक, सुप्रसिद्ध कथाकार दिगंबर कदम यांच्या 'कृतार्थ' या गौरव ग्रंथाचे संपादन अशा अनेक पुस्तकांचे त्यांनी संपादन केलेले आहे. यांसह अनेक साहित्यिकांच्या पुस्तकांचे मुद्रितशोधन करून त्यावर व्याकरणीय संस्कार ते सातत्याने करत असतात. त्यानंतर व्यंकटेश चौधरी यांचा आता नव्याने आलेला 'अनाहत' हा कवितासंग्रह नांदेड येथील सुप्रसिद्ध इसाप प्रकाशनाने प्रकाशित केलेला आहे. या पुस्तकाचे मुखपृष्ठ पुणे येथील सुप्रसिद्ध चित्रकार चंद्रमोहन कुलकर्णी यांनी आपल्या खास तरलशैलीत बनविलेले असून,अक्षरमांडणी विजयकुमार चितरवाड यांनी केलेली आहे. अर्थातच 'अनाहत' काव्यसंग्रहाच्या निर्मितीकौशल्याने





व त्यातील आशयघन भावाभिव्यक्तीने सर्वांचे लक्ष वेधून घेतलेले आहे.

कवी व्यंकटेश चौधरी यांच्या 'अनाहत' या कविता संग्रहातून आलेली कविता 'स्व' आत्माभिव्यक्तीचे आविष्करण करत; प्रेमाच्या विफल भावावस्थेतून प्रकट होत जाणारा एक अव्यक्त वेदनांचा अंत:स्वर आहे. ही कविता कधी कधी प्रेमाच्या अथांग सागरात डुंबत राहून प्रेमानुभूतीचा ती अखंड आस्वाद घेत राहते. कधी विरहात व्याकुळ होऊन सखीच्या डोळ्यात स्वप्ने पेरतांना धुंद होते, तर कधी उद्धवस्ततेनंतर दबून गेलेल्या श्वासासारखी अस्वस्थ करत राहते. मनात ठसठसत असतांनाही हव्याहव्याशा हळव्या वेदनांना कुरवाळत राहते. आपल्या व्यक्तिमत्त्वाला विविध पैलू असलेले कवी व्यंकटेश चौधरी हे 'अनाहत'मधील आपल्या पहिल्याच कवितेत आपल्या अव्यक्त प्रेयसीला उद्देशून तिच्या उदात्त आणि निस्सीम प्रेमाशी आपली तुलना करताना म्हणतात..

'तू
अथांग
अनंत
दिगंत
मी
अनंग
भणंग
वसंत'

या कवितेतून कवीने स्वत:सह त्यांची प्रेयशी यांच्यातील नाजूक नात्याचे तुलनात्मक वर्णन केलेले आहे. अल्पाक्षरत्व हे या कवितेचे रूप असून; आशयघन तरल भावाभिव्यक्ती हा या कवितेचा प्राण आहे. त्यातून प्रकट होत जाणारा विविधांगी भावतरंग हे या कवितेचे सौंदर्यस्थळ आहे. कवीने प्रियेसाठी योजिलेले 'अथांग' आणि 'अनंत' हे शब्द प्रेमाच्या अस्सीम, अमर्याद स्वरूपाचे प्रतीक होऊन आलेले आहेत. तर प्रियेसाठी 'दिगंत' हा शब्द वापरलेला आहे. त्यातून कवितेतील तिचे प्रेम आभासी, अनंत अशा 'क्षितिजा'सारखे अमर्याद असून ते कुठेही न संपणारे असे अवीट, अस्सीम असल्याचे वर्णन या कवितेतून कवीने केलेले आहे.

'मी'चा उल्लेख करून चिंतनाच्या पातळीवर स्वत:च्या अस्तित्वाची जाणीव करून देण्यासाठी 'अनंग' हा शब्द कामदेवाचे दुसरे नाव असून जे प्रेम आणि आकर्षणाचे प्रतीक म्हणून आलेला आहे. 'भणंग' म्हणजे भटकणारा किंवा निराश्रीत असा होत असून, कवी प्रेमभावनेचा अस्सीम भुकेला आहे. त्यासाठी कवीने योजिलेला 'भणंग' हा शब्द भटकणाऱ्या अतृप्त मानवी मनाचे प्रतीक होऊन आलेला आहे. दोघांचे मिलन झाल्यावर ती भावाभिव्यक्त करते, तेव्हा तो 'वसंत' ऋतुसारखे सर्वांगाने फुलून येतो. आनंदाची अनुभूती व्यक्त करतो. प्रेमातील विविध भावतरंग व्यक्त करतांना आत्मचिंतनाच्या सखोल पातळीवर हळवेभाव निसर्गातील प्रतीक आणि प्रतिमांचा वापर करून मानवी मनातील भावभावनांना कवीने व्यक्त केलेले आहे. प्रिय व्यक्तीच्या सहवासाची, एकमेकांना भेटण्याची आतुरता असहाय्यतेला पोहोचते. त्यांचे देहातीत मिलनानंतर तृप्तीची अनुभूती व्यक्त करणारे वर्णन करताना कवी म्हणतो..

'बघ,
एका अनावर
आवेगा नंतर
शांत झालेत
त्यांचे श्वास
आता नाहीत मोहवणार, कसलेच कोणतेच भास, ही ग्लानी की समाधी, कोणती ना कोणास भ्रांत'

या मिलनातून अपारशांतीची अनुभूती प्राप्त होते. मनाला मग कोणतेच भास खुणावत नाहीत. ती दोघेही एका् अविचल अशा स्थिर मनोवस्थेला प्राप्त होतात. तो एक एक क्षण ध्यानस्थ समाधीसारखं अनंततृप्तीची अपार अनुभूती देतो.

कधी कधी दोघेही स्वप्नांच्या गावी जाऊन मनमोराच्या हिंदोळ्यावर आतुरलेल्या, अधीर प्रीतीची आनंदानुभूती घेत असतात. कधी मनात स्वप्नांची गर्दी व्हायला लागते. रिमझिम पावसात मनसोक्त सोबत भिजायचे..भविष्यातील सहवासाचे स्वप्नं पाहत आणाभाका घेत कितीही चढ उतार आले तरीही पळस फुलांसारखं हसतहसत मस्त जगायचं..असे वर्णन करताना कवी म्हणतात..

'खूप भिजू या वेळी पावसात..
गुलाबी थंडीत मस्त घुस्मटून घेऊ..
सागरलाटांशी बोलत निवांत सूर्यअस्ताशी
भूतकाळ सोलत भविष्य विणू..
असंही करू या ना रे..
चांदणरात्री गोंदवून घेत अंगभर
पहाटेला सोबत करू..
पळस पांघरू वसंतात.
आपल्या चैतन्याचा साक्षीदार करू'

मानवी जीवनात करावी लागणारी संसारीक धडपड आणि त्यातून मानवी मनाला आलेली उद्विग्नता यातून माणूस हा यांत्रिक भावनाशून्य बनत जातो. सुख, समाधान आणि शांती पार कुठेतरी दूरवर गेलेले असते. पण हे सर्व अपरिहार्य असते. शेवटी मानवी जीवन म्हणजे, असंख्य सामाजिक, नितीमूल्यांच्या बंधनांचा तोल सांभाळत करावयाची कसरत असते. या कृत्रिम बंधनात निशंक, निर्मळ, असलेलं निखळ प्रेम प्रत्येकाच्या वाट्याला येईलच की नाही याची शाश्वती देता येत नाही. कधीतरी भुतकाळाच्या गाभाऱ्यात त्यांच्या अजान निर्मळ मनावर कुणीतरी नाजूक हातांनी सुंदर रांगोळी काढलेली असते. त्याच रांगोळीचे विविध रंग त्याच्या मनाच्या गाभाऱ्यात रेंगाळत राहतात. बाह्य जगातील असंख्य रांगोळी त्याला ती अवीट गोडी देऊ शकत नाहीत. ती रांगोळी चितारलेल्या नाजूक, कोमल हातांशिवाय बाकी सर्वांचे अस्तित्व शून्यमय भासत असते. अशा रहाट दिनचर्यतून त्रस्त झालेल्या मनाला सुखाचा गार शिडकावा मिळावा आणि निवांतपणा यावा यासाठी तो आपल्या प्रियशीला आतुरतेने आर्त पुकारत म्हणतो..

'कुस हवीये तिची
अस्तित्व विलीनासाठी
हा घनभर नाहीच सोसवत
म्हणून रितं रितं करण्यासाठी'

अशा अतृप्त प्रियकराला आपलंसं करून घेण्यासाठी जेव्हा प्रियेशी जवळ नसते..तेव्हा कवीला कवितेचा आधार वाटतो. तिच्या सहवासातील सुखद आठवणी आता दुःखद कशा झाल्या हे सांगण्यासाठी त्याला कविता जवळची वाटते. तो आपल्या काळीजकुप्पीत ठेवलेल्या भावनांना कवितेच्या कानात सांगत राहतो. त्या कितीही सांगितले तरीसुद्धा संपत नाहीत हे कळल्यावर त्यांच्या काळजाला कळ लागते आणि तो कवितेलाच म्हणतो..

'कविते,
तू मला गवसायला
नकोच होते
पुन्हा फिरून मग उसवायला
नकोच होते..
हे विसरून सारेच आता
मी रूळलेल्या रस्त्यालगत
निर्ढावत जातांना
आता पुन्हा एकाकीपण
पुन्हा हे सारे नव्यानेच जुन्याच
नकोच होते.'

येथे कवीला कवितेच्या सामर्थ्याविषयी प्रचंड अभिमान आहे. कवितेच्या सामर्थ्याची जाणीव आहे. म्हणून तो कवितेलाच जवळ करत पुन्हा पुन्हा मनातील वेदनांना कवितेतून प्रवाहीत करत राहतो. जीवनातील असंख्य चढउतारांना समर्थपणे तोंड देत जगत असतो. तुझी अस्तित्व,तुझी साथसंगत असली तर असंख्य दुःखाचे पर्वतही मी सहज पार करून जाऊ शकतो असे म्हणताना कवी म्हणतो,

जग लाताडतांना
मी शोधत असतो कूस तुझी
इतकं निवांत आश्वासक की
काशी मदिना माझी

कवीला कविता ही फार जवळची वाटते, एवढेच नव्हे तर आपल्या दुःखद मनाचा सुखद विसावा म्हणून तो कवितेकडे पहातो. अभिव्यक्तीचे माध्यम झालेली कविता ही कवीला काशी व मदिना या श्रद्धास्थळांसारखीच पवित्र वाटते. म्हणून आपल्या हृदयातील गुजगोष्टी तो कवितेलाच सांगू लागतो.

हे सांगताना कवी हे सर्व पहाटरंग आहेत हे सांगण्यास विसरत नाही हे विशेष आहे. कारण दिवस मावळतीला लागला की, सांजसावल्या लांब होत असतात. तेव्हा अतृप्त मनाच्या पोकळीत आठवणींची भाऊगर्दी होत राहते. वर्तमानात कवी नजरेने पश्चिम क्षितिजावर पसरणारी संध्याछाया अनुभवत असतांनाही, कधीकाळी पूर्वदिशेने उधळलेल्या गुलाबी रंगछटेचे चित्र मनाच्या कॅन्व्हासवर जिवंत साकारताना तसूभरही रंग फिकटलेला दिसू देत नाही हेही विशेष आहे.

कवी व्यंकटेश चौधरी यांच्या कवितेत आलेल्या भणंग, वेदनांचे घर, तलखीचे घाव, पांगुळगाडा, उध्वस्त गाव, शंकेचं बीज, सांजसावल्या, स्वप्नांची वस्ती, चांदणराती, स्तब्ध श्वास, जुन्या जखमा, हळवा कोपरा, मेघ मल्हार, व्याकुळलेले ढग, देहभर दरवळ, भूतकाळाच्या वाती, संमोहन, अनावर हुरहूर, जीवजाळी स्पर्श, कल्पनेचा मेणा, पुनवराती, आत्मगंधी, चांदचुरा यांसारख्या अनेक प्रतिमा व प्रतिकांमुळे ही कविता अधिकच भावविभोर आणि आशयघन झालेली आहे. ही कविता वाचतांना प्रत्येक वाचकाला आपल्या आयुष्याच्या पूर्वरंगाची आठवण झाल्याशिवाय राहत नाही. कालातीत असलेली ही कविता म्हणजे एका अव्यक्त वेदनेचा अंत:स्वर आहे.

कवी व्यंकटेश चौधरी हे साहित्य सागरात उजळ माथ्याने जाणिवेच्या नावेतून साहित्यप्रवास करणारा नावाडी आहे. त्यांच्या लेखणीतून अशा असंख्य अनाहत ध्वनींचा शब्द प्रवाह खळाळत राहो या सदिच्छेसह खूप शुभेच्छा.!

**पुस्तक : 'अनाहत' (कवितासंग्रह)**
**कवी : व्यंकटेश चौधरी**
**प्रकाशक : इसाप प्रकाशन, नांदेड**
**मुखपृष्ठ : चंद्रमोहन कुलकर्णी, पुणे**
**मूल्य– २४० रु.**

# सध्याच्या शिक्षणाची ढासळती गुणवत्ता अन् भविष्यातील शिक्षणाची अवस्था

शिक्षण म्हणजेच गुणवत्ता वृद्धी. शैक्षणिक गुणवत्तेची व्याख्या आणि मोजमाप करणे, हे तसे अवघड व गुंतागुंतीचे काम. जगात शिक्षणाच्या इतिहासात शिक्षण गुणवत्ता–पूर्ण असायाल हवे असा विचार सातत्याने मांडण्यात येतो. शिक्षणाच्या इतिहासाची पाने चाळली तर शिक्षण गुणवत्तापूर्ण होते असे फारसे दिसत नाही. खरं तर गुणवत्ता म्हणजे नेमके काय? हे व्याख्येत बांधण्याचा प्रयत्न आजवर अनेकांनी केला आहे. मात्र, त्या व्याख्येत अपेक्षांची भिन्नता दिसून येते. शिक्षणाच्या प्रक्रियेत आपण गुणवत्तेचा जो विचार करतो आहोत आणि त्यात गुणवत्तेची जी कल्पना आहे ती व्यक्तसापेक्ष संकल्पना आहे. समाज जसा जसा गतिमान होत जातो त्याप्रमाणे शिक्षणाकडून देखील अपेक्षा सतत बदलत जात आहेत. जगभरात होणारी संशोधने, औद्योगिक विकास, समाजात रूजणारे विज्ञान, बदलणारी राजकीय विचारधारा यानुसारही शिक्षणाकडून अपेक्षा बदलत जातात

वर्तमानातील अपेक्षा पूर्ण करण्याचा प्रयत्न शिक्षणाकडून होण्याची गरज असते. मात्र, त्या अपेक्षा शिक्षणातून साध्य होतील असे घडत नाही. वर्तमानातील अपेक्षा शिक्षणाकडून पूर्ण झाल्या नाही तर शिक्षण गुणवत्तापूर्ण नाही असे मानले जाते. त्यामुळे शिक्षण गुणवत्तापूर्ण करण्यासाठीचे प्रयत्न व्यवस्थेत सातत्याने होत असतात. प्रयत्न जसे होत जातात त्याप्रमाणे अपेक्षा पुन्हा उंचावत जातात हेही वास्तव आहे. शिक्षणातून अपेक्षा असतात आणि त्या पूर्ण करण्यासाठी काळ लागत असतो. त्यामुळे वर्तमानातील अपेक्ष पूर्ण करण्यासाठी भविष्यात वाट चालावी लागते. वाट जशी चालत जातो त्याप्रमाणे अपेक्षा पुन्हा पुन्हा उंचावत जातात. त्यामुळे शिक्षणात अपेक्षां पूर्णत्वाला जाण्याची शक्यता कधीच नसते.

आज बऱ्याच शाळा ओसाड पडत आहे. कारण तिथे शिक्षकांचा तुटवडा पडत आहे. कुठे ७ वर्गासाठी १ किंवा २ तर कुठे ५ वर्गासाठी १ च शिक्षक आहे. त्यामुळे शिक्षणाची अपेक्षापूर्ती होत नाही. यामुळे शिक्षणाची गुणवत्ता ढासळत चालली आहे. केवळ हेच कारण नाही, तर बरेच शिक्षक आपल्या शिक्षकीपेशाला काळीमा फासणारे आहेत. ब–याच शिक्षकांच्या हालचालीवरून, व्यवहारावरून एकंदरीत त्यांच्या वर्तवणूकीवरून ते विद्यार्थ्यांचं काय भविष्य घडवतील हा प्रश्न सतत मनाला सतावतो. यातीलच एक कारण पुढे करून शिक्षक पण शिकविण्यास पात्र असावे म्हणून राज्य शासनाने शिक्षक पात्रता परीक्षा घेणे सुरु केले आहे. विद्यार्थ्यांना घडविणारे शिक्षकवृंद पण 'तावून सुलाखून' निघणार असतील तर उत्तम. हा त्यामागचा हेतू शासनाने ठेवला.

उद्याची पिढी घडवणाऱ्या राज्यातील प्राथमिक व उच्च प्राथमिक शिक्षक पात्रतेसाठी महत्त्वाची असलेली महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (महाटीईटी) च्या २०२५ मध्ये झालेल्या अंतिम परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. मात्र, या निकालाने राज्यातील अनेकांच्या अपेक्षांवर पाणी फेरले गेले आहे. हा निकाल शिक्षण क्षेत्रास चांगलाच धक्का देणारा ठरला असून राज्यातील शिक्षक गुणवत्तेवर गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. या परीक्षेत केवळ ११.२८ टक्के शिक्षक उमेदवार उत्तीर्ण झाले. ४.७५ लाख शिक्षकांपैकी ३ लाख ९६ हजार शिक्षक अनुत्तीर्ण झाले ही बाब धक्कादायक आहे. केवळ धक्कादायकच नसून भविष्यातील शिक्षक व शिक्षण यांच्या दारुण परिस्थितीवर प्रकाश टाकणारी आहे. सर्वाधिक कन्नड माध्यमाचे १५ टक्के तर मराठीचे १२.२८ टक्के, हिंदीचे १२.१९ टक्के तर तेलुगू माध्यमाचे याच सरासरीच्या आसपास उमेदवार उत्तीर्ण झाले. यात उर्दू, इंग्रजी आणि विशेषत: गुजराती माध्यमाचा निकाल सर्वात कमी ३.४४ टक्के लागला.

क्षेत्र कोणतेही असो मग ते आयटीचे असो की वैद्यकीय. झपाट्याने होणाऱ्या बदलांना सामोरे जाताना स्वत:ला कालसुसंगत राखणे हे आवाहन झाले आहे. एकदा डीएड झालो आणि शिक्षक म्हणून चिकटलो की मोकळे ही बऱ्याच शिक्षकांची मानसिकता...आता वर्षानुवर्ष मी कुठल्याही परीक्षेला कशाला सामोरे जायचे? या भावनेतून टीईटी परीक्षेला काही शिक्षक संघटनांचा विरोध राहिला. अन्य क्षेत्रात स्वत:ला अपडेट ठेवण्याकरिता धडपड सुरु असताना शिक्षकांनी अशी भूमिका घेणे हे योग्य नव्हेच. एआयमुळे वेगवेगळ्या क्षेत्रात झपाट्याने बदल होत आहेत. भविष्यात शिक्षण क्षेत्रही त्यापासून वेगळे नसेल. त्यामुळे आपल्या बुद्धीला तावूनसुलाखून पाहण्यात काहीच गैर नाही.

मात्र, ज्यांनी शिकविण्याकरिता अजून खडू हातात धरलाही नाही, अशा शिक्षकांची या परीक्षेत अनुत्तीर्ण झाल्याची मोठी संख्या आहे. आता जे उत्तीर्ण झाले ते सध्या शिक्षक असून ही परीक्षा दिल्याखेरीज आपली नोकरी कायम होणार नाही, अशी टांगती तलवार मानगुटीवर कायम असल्याने ज्यांनी परीक्षा दिली तेच यात उत्तीर्ण झाल्याने निकाल ११ टक्क्यांच्या आसपास लागला. यावरून भविष्यातील शिक्षक व शिक्षण यांची अवस्था कशी भीतीदायक आहे, याचाच साक्षात्कार होतो. शिक्षक होण्याकरिता धडपडणा–यांना अपयश येण्याचे मुख्य कारण हे सध्याच्या कंत्राटी शिक्षणात आहे. अनेक युवक–युवती वेळप्रसंगी अन्य छोटी–मोठी कामे करणे पसंत करतात. मात्र, शिक्षक होण्याला तिलांजली वाहतात. अत्यल्प वेतन देऊन अनेक शैक्षणिक संस्थांमध्ये शिक्षकांची पिळवणूक होते. एका रकमेवर स्वाक्षरी घ्यायची आणि अत्यल्प रक्कम हातावर टेकवायची, असे प्रकार अनेक शैक्षणिक संस्थामध्ये सर्रास होत असल्याचे दिसून येते. त्यामुळे अन्य कुठल्याच क्षेत्रात पाय रोवता आला नाही तोच शेवटचा पर्याय म्हणून या क्षेत्राकडे वळतो, असे म्हटले तर ते अयोग्य ठरणार नाही. याच भीतीपोटी असले प्रकार सहन करण्यावाचून पर्याय नसतो.

ज्यांना निवृत्तीला केवळ ६ महिने बाकी आहेत. अशा शिक्षकांनाही ही परीक्षा सक्तीची केली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालामुळे ही परीक्षा अनिवार्य केली गेली. एकीकडे अशैक्षणिक कामाच्या बोजाने शिक्षक त्रस्त आहेत. शालेय पोषण आहारा–तील तांदुळाचा हिशेब ठेवण्यापासून तंबाखू–मुक्त अभियानाची माहिती सरकारला भरून देण्यापर्यंत जवळपास शंभरेक कामे शिक्षकांना लावली आहेत. सरकारचे अशैक्षणिक कामे शिक्षकांवर लादण्याचे धोरण असमर्थनीय आहे. यामुळे शिक्षकांचे मूळ कामाकडे दुर्लक्ष होत आहे. या कामांच्या बोजाने शिक्षक अक्षरश: वाकले आहेत. शिवाय शिक्षकांकरिता वेगवेगळे प्रशिक्षण आयोजित केले जाते. त्यामुळेही या परीक्षेला विरोध होत आहे. टीईटी परीक्षेची काठिण्य पातळी जास्त आहे. दिलेल्या ४ पर्यायातून १ पर्याय निवडायचा असतो. शिवाय निगेटिव्ह मार्किंग (नकारात्मक गुण पद्धत) आहे. त्यामुळे अनेकदा शिक्षकांचा गोंधळ उडतो. परिणामी त्यांच्या पदरात भोपळा पडतो. जसे टीईटी परीक्षेला विरोध करणाऱ्यांचे समर्थन करता येत नाही तसेच टीईटीची सरसकट सक्ती ही देखील योग्य म्हणता येत नाही. विद्यार्थ्यांकडून गुणवत्तेची व पैकीच्या पैकी गुणांची अपेक्षा करणाऱ्या शिक्षकांनी टीईटी परीक्षेत अधिक चमकदार कामगिरी करून आपली गुणवत्ता सिद्ध करावी ही अपेक्षा बाळगणे अचूक आहे.

–सुनील शिरपुरे
कमळवेल्ली, यवतमाळ
मो. ७०५७१८५४७९

## स्मरण क्रांतिवीरांचे !

जे लढले होते तेव्हा
आज ते अस्तित्वात नाहीत,
आहेत जे आज ईथे त्यांना
स्वातंत्र्याचे मोलच नाही
दुःखाची झळ सोसली त्यांनी
भविष्याची पर्वा केली नाही,
सुख आज आम्ही उपभोगतोय
आम्हाला त्यांची कदर नाही...
स्वप्न त्यांच्या डोळ्यातले
पारतंत्र्यात कधी साकारले नाही,
त्यांच्या स्वप्नांचे मूल्य
आम्हाला आज कळणार नाही
रक्त सांडले, फास स्वीकारला
जखमांना कधी कुरवाळले नाही,
ध्यास एकची स्वातंत्र्याचा
मोहाचा स्पर्श होऊ दिला नाही...
हसत हसत लढत राहिले
वंदे मातरम् बोलण्यास विसरले नाही,
मृत्यु समोर उभा असतानाही
माघार त्यांना मान्य नाही
देशाला केले मुक्त जोखडातून
छळाला त्यांनी जुमानले नाही,
लढले ते वीर क्रांतिकारक
स्वातंत्र्याची फळे त्यांनी चाखली नाही...
गणतंत्र दिनाच्या या पवित्र क्षणी
त्यांना न स्मरून चालणार नाही
ते लढले म्हणून आज आहोत आपण
त्यागाविना त्यांच्या आपले अस्तित्वच नाही
आपले अस्तित्वच नाही

–ज्योती रावराणे,
कांजूरमार्ग, मुंबई

## थोडक्यात...

### गझलकार मारोती मानेमोड यांना राज्यस्तरीय 'गावगाडा' गझल साहित्य पुरस्कार जाहीर

**नायगाव (प्रतिनिधी)**– मराठी गझल क्षेत्रात आपली आगळीवेगळी ओळख निर्माण करणारे नरसी येथील रहिवासी गझलकार मारोती मानेमोड उर्फ राया यांना विश्वकर्मा तरुण मंडळ,



वडशिवणे (ता. करमाळा, जि. सोलापूर) यांच्या वतीने दिला जाणारा स्व. सतीश दराडे राज्यस्तरीय 'गावगाडा' गझल साहित्य पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

मानेमोड यांचा पहिलाच गझलसंग्रह 'निर्गुणी आकार' वाचक आणि साहित्य वर्तुळात विशेष चर्चेत राहिला आहे. या संग्रहातील हृदयस्पर्शी व मर्मभेदी गझलांनी अनेक पुरस्कार मिळवले असून, संपूर्ण महाराष्ट्रभर या संग्रहाने लोकप्रियतेचा ठसा उमटवला आहे. या पुरस्कारामुळे मानेमोड यांच्या साहित्यिक वाटचालीत आणखी एका मानाच्या सन्मानाची भर पडली आहे. त्यांचे अभिनंदन होत आहे.

### प्रियंका सूर्यतळे- बावस्कर यांची तंत्रज्ञ पदावर नियुक्ती

**नांदेड (प्रतिनिधी)**– महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने नुकतेच तीन वर्षाचा कंत्राटी कालावधी पूर्ण



केलेल्या विद्युत सहाय्यकांना तंत्रज्ञ पदावर सामावून घेतले असून, यात प्रियंका सूर्यतळे –बावस्कर यांचा समावेश आहे. महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने दिनांक ३ फेब्रुवारी २०२६ रोजी आदेश काढले असून, या आदेशात तीन वर्षे कंत्राटी कालावधी पूर्ण केलेल्या पाच विद्युत सहायकांना तंत्रज्ञ पदावर सामावून घेतले आहे. यात प्रियंका सूर्यतळे –बावस्कर यांचा समावेश असून त्यांना संचलन व सुव्यवस्था उपविभाग २ नांदेड या ठिकाणी तंत्रज्ञ पदावर पदस्थापना देण्यात आली आहे.

# विज्ञान-तंत्रज्ञानाशी योग्य सांगड घातल्यास ऊर्जा स्त्रोत पुनर्निर्मिती शक्य –प्रो. मुराकामी

**नांदेड (प्रतिनिधी)**– विज्ञान व तंत्रज्ञानाची योग्य सांगड घातल्यास ऊर्जा स्त्रोत जिवंत ठेवून त्यांची पुनर्निर्मिती करणे शक्य असल्याचे प्रतिपादन प्रोफेसर री-ची मुराकामी यांनी केले. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील रसायनशास्त्र व भौतिकशास्त्र संकुलांच्या वतीने पीएम-उषा योजनेच्या अर्थसहाय्याने आयोजित दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.



प्रो. मुराकामी यांनी आपल्या उद्घाटनपर भाषणात ऊर्जा स्त्रोतांचे संवर्धन, त्यांची पुनर्निर्मिती तसेच वाहतूक क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने त्यांचा प्रभावी वापर कसा करता येईल, याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. जैविक प्लास्टिकची निर्मिती, त्यांचे गुणधर्म व विविध उपयोग यावर त्यांनी विशेष भर दिला. मात्र या क्षेत्रात सर्व संबंधित शाखांचा समन्वय साधून तंत्रज्ञान विकसित करणे हे भविष्यातील मोठे आव्हान ठरणार असल्याचेही त्यांनी नमूद केले. यावेळी कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या हस्ते प्रो. मुराकामी यांचा शाल, पुस्तक व गौरवचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

परिषदेच्या अध्यक्षस्थानी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन होते. अध्यक्षीय भाषणात त्यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत करून मटेरियल सायन्स, सेमी-कंडक्टर, इलेक्ट्रॉनिक्स व संसाधनांवरील संशोधन, निर्मिती आणि शाश्वत उपयोगिता या विषयांवरील परिषदेचे उद्दिष्ट विशद केले. याप्रसंगी विज्ञान व तंत्रज्ञान अधिष्ठाता डॉ. एम. के. पाटील, रसायनशास्त्र अभ्यास मंडळाचे संचालक डॉ. डी. आर. मुंडे, तसेच डॉ. टी. ए. कदम उपस्थित होते.

परिषदेतील दुसरे व्याख्यान प्रो. मोहम्मद एस. बडवाय (एलामेन इंटरनॅशनल युनिव्हर्सिटी, इजिप्त) यांनी टेक्नॉलॉजी अँड चॅलेंजेस ऑफ रेडीओॲक्टीव्ह मटेरियल अँड एनर्जी सोर्सेस ॲप्लिकेशन या विषयावर दिले. त्यांनी रेडिएशन ऊर्जेचे प्रकार, विविध क्षेत्रांतील उपयोगिता तसेच या संशोधन क्षेत्रातील आव्हानांवर सविस्तर प्रकाश टाकला.

दुपारच्या सत्रात डॉ. योगेश दशरथे (नोव्हा पॉलीकॅम्प प्रा. लि., छत्रपती संभाजीनगर) यांनी प्लास्टिकचे उपयोग, रिसायकलिंग, रियूज तसेच बायोप्लास्टिक निर्मितीचा अक्षय ऊर्जा निर्मितीत होणारा उपयोग यावर आपले विचार मांडले. तसेच इजिप्त येथील इस्रा खमिस यांनी सप्लाय चेन या विषयावर अभ्यासपूर्ण व्याख्यान दिले.

कार्यक्रमाची सुरुवात पूज्य स्वामी रामानंद तीर्थ यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून व दीपप्रज्वलनाने करण्यात आली. प्रास्ताविक भौतिकशास्त्र संकुलाचे संचालक डॉ. राजाराम माने यांनी केले, तर रसायनशास्त्र संकुलाच्या संचालिका व परिषदेच्या संयोजिका डॉ. संगीता माकोने यांनी हरित ऊर्जा निर्मितीसाठी रसायनशास्त्राचे महत्त्व विशद करून आभार प्रदर्शन केले. सूत्रसंचालन डॉ. अविनाश सरोदे यांनी केले.

# संस्कार भारती नांदेडतर्फे आयोजित 'अमृताहुनी गोड' कार्यक्रमाला प्रतिसाद

**नांदेड (प्रतिनिधी)**– सुप्रसिद्ध शास्त्रीय, नाट्यगीत, व भावभक्तीगीत गायिका पद्मश्री माणिक वर्मा यांच्या जन्मशताब्दी वर्षाचे औचित्य साधून संस्कार भारती नांदेडतर्फे भरतमुनी स्मरण दिनानिमित्त 'अमृताहुनी गोड' हा पद्मश्री स्व. माणिक वर्मा यांनी गायिलेल्या सुमधुर गीतांचा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.



आरंभी मान्यवरांच्या हस्ते नटराज व नाट्यशास्त्रकार आचार्य भरतमुनी यांचे प्रतिमा पूजन करण्यात आले. या वेळी आशिष नेरळकर, पं. संजय जोशी, महामंत्री डॉ. जगदीश देशमुख, सुरमणी धनंजय जोशी, नांदेड संगीतभूषण असलेल्या श्रीमती सीताभाभी, अध्यक्षा सौ. राधिका वाळवेकर, कार्याध्यक्ष जयंत वाकोडकर, सचिव सौ. अंजली देशमुख इत्यादी उपस्थित होते. त्यानंतर शारदा संगीत विद्यालयाचे बाल विद्यार्थ्यांनी संस्कार भारती ध्येयगीत सादर केले. त्यानंतर संगीत कार्यक्रम सुरू झाला.

'जोगकंस' रागाचे जनक, माणिकबाईंचे गुरू जगन्नाथबुवा पुरोहित यांच्या सौ. जयश्री आजेगावकर यांनी गायलेल्या 'पीर पराई' या बंदिशीने कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यांनीच पुढे 'त्या सावळ्या तनुचे', 'घननीळा लडिवाळा' ही गाणी सादर केली.

सौ. अंजली दीक्षित यांनी 'शरदाचे चांदणे' 'अमृताहुनी गोड', 'मनी माझिया', 'तुझा नि माझा एकपणा', 'त्या चित्तचोरट्याला', 'खरा तो प्रेमा' तसेच सौ. शिवकांता पडोळे यांनी 'कौसल्येचा राम', 'आभाळीचा चंद्र' व 'हसले मनी चांदणे' ही गीते सुंदर हरकतीसह बारकाईने सादर करून सर्व कलावंतांनी रसिकांची दाद मिळवली. अखेरीस तिन्ही गायिकांनी 'जनी नामयाची रंगली कीर्तनी' ही भैरवी सादर केली. गुणी कलाकार प्रणव पडोळे आणि हरिप्रसाद पांडे यांची संवादिनी व तबल्याची साथसंगत अत्यंत पूरक आणि उत्तम होती.

रसिकांना चतुरस्त्र गायिका असणाऱ्या माणिकबाईंच्या अभिजात संगीत, भक्तिगीत, भावगीत, नाट्यगीत, चित्रपट गीत,. गज़ल अशा विविध गीत प्रकारांचं आणि माणिकबाईंच्या आवाजातलं आर्जव, मार्दव, लडिवाळपणा, सोज्वळता, सात्विकता या सुरांच्या गुणांचं आणि एक शिष्या, पत्नी, आई, बाई आणि मुख्यत्वेकरून माणूस म्हणून असणाऱ्या मिनिटांच्या गुणांच्या नितळ प्रतिबिंबाचंही दर्शन या मैफलीत घडलं!

प्रा. डॉ. सौ. वैशाली गोस्वामी-कुलकर्णी यांनी कार्यक्रमाचे निवेदन करून माणिक वर्मा यांच्या संगीत कारकिर्दीचा जीवनपट सुंदर उलगडून दाखवला. या कार्यक्रमात संगीत महामहोपाध्याय पंडिता सीताभाभी, आशिष नेरळकर, दिलीप ठाकूर, डॉ. गुंजन शिरभाते व गजानन पिंपरखेडे यांचा सत्कार करण्यात आला.

# ३ नळ व १ ड्रेनेज कनेक्शन केले बंद तर २ मालमत्ता अटकावणीसह ३ व्यावसायिक दुकाने सील

**नांदेड (प्रतिनिधी)**– महापालिकेच्या कर विभागामार्फत मालमत्ता कर वसुली मोहिमेला गती देण्यात आली असून, थकबाकीदारांवर मालमत्ता जप्तीची कठोर कारवाई करण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत गुरुवार, दि. ५ फेब्रुवारी रोजी नांदेड शहरातील निवासी मालमत्तेवरील ३ मालमत्ताधारकांचे नळ व १ ड्रेनेज कनेक्शन बंद केले असून, २ निवासी मालमत्तांची अटकावणीसह ३ व्यावसायिक मालमत्तांवर जप्तीची कारवाई करण्यात आली आहे. नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांच्या निर्देशानुसार उपायुक्त अजितपालसिंघ संधु यांच्या मार्गदर्शनाखाली जप्ती पथकाकडून ही मालमत्ता जप्तीची कारवाई करण्यात आली आहे.

शहरातील थकबाकीदार मालमत्ताधारकांना वारंवार सूचना, नोटिसा देऊनही काही थकबाकीदारांकडून कर भरण्याकडे दुर्लक्ष केले जात आहे. त्यामुळे महानगरपालिकेने आता कठोर भूमिका घेत दि. ५ फेब्रुवारी रोजी शिवाजीनगर या क्षेत्रिय कार्यालया अंतर्गत मालमत्ताधारक वामन सत्ताजी इंगोले, शेख इब्राहीम वाहिद हुसैन व के. डी. फर्नांडीस यांच्याकडे एकत्रितपणे रु.१.७४ लक्ष कर थकीत असल्याने या मालमत्ताधारकांचे नळ व ड्रेनेज कनेक्शन बंद करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे इतवारा क्षेत्रिय कार्यालयाअंतर्गत शेख मुस्तफा शेख चंदा व वशीब अहेमद अ. खदीर यांच्याकडे एकत्रितपणे रु.४.२९ लक्ष एवढी थकबाकी असल्याने त्यांच्या एकूण २ मालमत्ता अटकावणीसह सिडको-हडको क्षेत्रिय कार्यालया अंतर्गत मालमताधारक धूत शांता बद्री, हाजी अब्दुल रहेमान मो. इमामोद्दीन व प्रकाश गोवारे यांच्याकडे एकत्रितपणे रु.४.५४ लक्ष एवढा कर थकीत असल्याने संबंधितांचे एकूण ३ व्यावसायिक मालमत्ता सील करुन जप्त करण्यात आलेली असून, कोणतीही सूट किंवा तडजोड न करता थकबाकीदारांवर थेट जप्तीची कारवाई करण्यात आली आहे.

मालमत्ता कर थकबाकीदारांची अचूक माहिती, क्षेत्रनिहाय नियोजन आणि वेळापत्रकबद्ध कारवाई या तीन बाबींवर भर देऊन ही मोहीम राबविण्यात येत आहे. प्रत्येक विभागीय कार्यालयामार्फत रोजच्या आढाव्यानुसार प्रगती तपासली जात असून थकबाकीदारांनी तातडीने कर भरणा केल्यास जप्ती कारवाई टाळता येऊ शकेल. त्यामुळे नागरिकांनी स्वयंस्फूर्तीने कर भरून महापालिकेला सहकार्य करावे असे आवाहन महापालिका आयुक्त डॉ.महेशकुमार डोईफोडे यांच्या वतीने करण्यात येत आहे.

# पीपल्स हायस्कूलचे राज्यस्तरीय शालेय हापकिडो बॉक्सिंग क्रीडा स्पर्धेत यश




**नांदेड (प्रतिनिधी)**– नांदेड एज्युकेशन सोसायटी संचलित पीपल्स हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा क्रीडा परिषद अहिल्यानगर व अहिल्यानगर जिल्हा हापकिडो बॉक्सिंग असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय शालेय हापकिडो बॉक्सिंग क्रीडा स्पर्धा २०२५- २६ मध्ये १९ वर्षे मुला- मुलींमध्ये पीपल्स हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे.

शालेय हापकिडो बॉक्सिंग स्पर्धेत शुभम मोहन गुनलवाड, सुप्रिया नारायण दर्शने -गोल्ड मेडल, रुद्राक्ष चंद्रकांत आढाव, अर्पिता जीवन जाधव- सिल्वर मेडल, असोसिएशन हापकिडो बॉक्सिंग स्पर्धेत शुभम मोहन गुनलवाड, रुद्राक्ष चंद्रकांत आढाव, संदीप रवीकुमार वायवळे, अर्पिता जीवन जाधव, सुप्रिया नारायण दर्शने सर्व गोल्ड मेडल व वीर राजू चिंचोरे सिल्वर मेडल आयकॉन असोसिएशन- शुभम गुन्नलवाड, रुद्राक्ष आढाव, अर्पिता जाधव सर्व गोल्ड मेडल, सुप्रिया दर्शने, संदीप वायवळे -सिल्वर मेडल, वीर चिंचोरे ब्रान्स मेडल प्राप्त केल्याबद्दल सदरील विद्यार्थ्यांचे शाळेचे मुख्याध्यापक प्रशांत चौधरी व माजी मुख्याध्यापक नितीन सेलमोकर यांच्या हस्ते प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

या विद्यार्थ्यांना क्रीडा शिक्षिका उषा कंधारे व कराटे प्रशिक्षिका रंजना आढाव यांनी मार्गदर्शन केले. या देदीप्यमान यशाबद्दल विद्यार्थ्यांचे नांदेड एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. व्यंकटेश काब्दे, उपाध्यक्ष सीए डॉ. प्रवीण पाटील, सचिव प्रा. शामलताई पत्की, सहसचिव अग्रवाल, शालेय समिती अध्यक्ष नौनिहाल सिंघ जहागीरदार, शाळेचे मुख्याध्यापक प्रशांत चौधरी, माजी मुख्याध्यापक नितीन सेलमोकर,योजना बच्चेवार, सांस्कृतिक विभाग प्रमुख व्ही आर. चिलवरवार, मंजुषा वानखेडे, मनोहर राठोड, सरोजना पुल्लावर, श्रद्धा सावले, मनीषा पालेपवाड, अनिता गुंडेवार, मंगेश चाभरेकर, प्रशांत मारलेवाड, प्रिया पवार, दीपिका यादव, श्रीराम गाडेकर यांच्यासह शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

# नांदेड परिमंडळात प्रधानमंत्री सूर्यगृह मोफत योजनेस उत्तम प्रतिसाद; १६२०३ घरांवर ६३.६७ मेगावॅट निर्मिती

**नांदेड (प्रतिनिधी)**– नांदेड, परभणी आणि हिंगोली जिल्ह्यांचा समावेश असणाऱ्या महावितरणच्या नांदेड परिमंडलात प्रधानमंत्री सूर्यगृर मोफत वीज योजना प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. योजनेंतर्गत १६२०३ घरांवर ६३.६७ मेगावॅट सौर ऊर्जेची निर्मिती केली जाते. अन्य वीज ग्राहकांनी ७८००० रुपयापर्यंतचे अनुदान असणाऱ्या योजनेत सहभागी होऊन वीज बिलाच्या कटकटीतून मुक्तता मिळविण्याचे आवाहन मुख्य अभियंता राजाराम माने यांनी केले आहे.

नांदेड परिमंडळाने जानेवारी २०२६ अखेरपर्यंत या योजनेची प्रभावी अंमलबजावणी केली असून, नांदेड जिल्ह्यात ७४८८ घरांच्या छतावर सौरऊर्जा निर्मिती पॅनेल्सू बसविले आहेत. त्यातून ३१.७७ मेगावॅट सौर ऊर्जा निर्मिती होते. परभणी जिल्ह्यात ६०९३ घरावरून २२.१७ मेगावॅट तर हिंगोली जिल्ह्यात २६२२ घरावर बसविलेल्या पॅनल्समधून ९.७४ मेगावॅट सौर ऊर्जा निर्मिती होते आहे.

घराच्या छतावरील सौर-ऊर्जा पॅनलद्वारे झालेली वीजनिर्मिती घरगुती वापरापेक्षा अधिकची असल्यास वीजबिल शून्यावर येईल. सौरऊर्जेची निर्मिती अधिकची असेल तर ती महावितरणला विकून उत्पन्न मिळविण्याचीही संधी या योजनेत आहे. छतावरील एक किलोवॅटच्या सौर वीज निर्मिती प्रकल्पातून महिना १२०, २ किलोवॅटच्या प्रकल्पातून महिन्याला २४० युनिट तर ३ किलोवॅटच्या प्रकल्पातून सर्वसाधारणपणे ३६० युनिट विजेची निर्मिती होऊ शकते.

ही सौर ऊर्जा योजना अनुदानावर आधारित आहे. एक किलोवॅटपर्यंत ३० हजार, दोन किलोवॅट – ६० हजार तर तीन किलोवॅट व त्यापुढील किलोवॅटसाठी ७८ हजार रुपयांचे अनुदान दिले जाते. विविध बँकांकडून सवलतीच्या व्याजदरात कर्ज सुविधाही योजनेसाठी उपलब्ध आहे.

# योगाचार्य सोनटक्के यांची आज छत्रपती चौक ते गोपाळचावडी योगिक दौड

**नांदेड (प्रतिनिधी)** – योगऋषी स्वामी रामदेव महाराज यांनी आदर्श योग शिक्षक म्हणून गौरवलेले आणि नांदेड योग रत्न पुरस्कार प्राप्त योगाचार्य सीताराम सोनटक्के व नित्ययोग सेवा समितीचे



योग साधक हे दिनांक ८ फेब्रुवारी रोजी रविवारी सकाळी १० वाजता छत्रपती चौक पूर्णा रोड ते श्री गुरु दशमुखाश्रम भीमाशंकरनगर गोपाळचावडी नवीन नांदेड या कार्यक्रम स्थळापर्यंत योगिक दौड पूर्ण करून जगदुरुचे आशीर्वाद घेणार आहेत.

योगाचार्य सिताराम सोनटक्के हे गेल्या १३० दिवसांपासून एकही दिवस खंड न पडता किमान सहा ते आठ किलोमीटर दररोज पहाटे योगिक दौड करून नित्य नियमाने योग वर्गात येतात व पहाटे ५ ते ७ निशुल्क योग वर्ग घेतात. योग वर्गात दररोज ४०० ते ५०० योग साधक नियमित उपस्थित राहतात.

नुकतेच २६ जानेवारी रोजी प्रजासत्ताक दिनानिमित्त शेतकरी चौक तरोडा नाका ते पोलीस मुख्यालय हनुमान पेठ अशी योगिक दौड करून योगाचार्य सिताराम सोनटक्के गुरुजी यांनी पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते योगाचे उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल सन्मान स्वीकारला होता. रविवार, दि. ८ फेब्रुवारी ते आपल्या सलग योगिक दौड संकल्पाचे १३३ दिवस पूर्ण करतील. या उपक्रमात शेकडो योगासाधक उपस्थित राहणार असल्याचे कळविण्यात आले आहे.

# राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा उत्साहात संपन्न

**नांदेड (प्रतिनिधी)** –येथील अक्षरोदय साहित्य मंडळ व मातोश्री भागाबाई विठ्ठलराव डोंगरे प्रतिष्ठान उमरीच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा २०२६ तसेच काव्यपौर्णिमा, मुलाखत व आंबेडकरी गझल मुशायरा हा साहित्यिक कार्यक्रम उत्साहात पार पडला. कार्यक्रमाचे उद्घाटन अक्षरोदय साहित्य मंडळाच्या राज्याध्यक्षा सिंधुताई दहिफळे यांच्या हस्ते झाले.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मंडळाचे मराठवाडा अध्यक्ष तथा साहित्यिक समीक्षक प्रज्ञाधर ढवळे हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून लोकसंवाद साहित्य संमेलनाचे मुख्य संयोजक दि. ग. कदम, प्रा. डॉ. चंद्रकांत चव्हाण, सप्तरंगी साहित्य मंडळाचे संस्थापक अध्यक्ष अनुरत्न वाघमारे, प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष प्राचार्य ए. एस. जाधव, मंडळाचे मराठवाडा उपाध्यक्ष शंकर कदम, डी. जी. तुपसाखरे, समाजसेवक शिवप्रसाद राठी, संयोजक नागोराव डोंगरे, सदानंद सपकाळे यांची उपस्थिती होती.

यावेळी पुरस्कार वितरणही करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतीबा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे तसेच मातोश्री भागाबाई डोंगरे व कालवश दीपक सपकाळे यांच्या प्रतिमांना मान्यवरांच्या हस्ते माल्यार्पण करुन अभिवादन करण्यात आले.

# एमजीएम ग्रंथालयशास्त्र महाविद्यालयात संशोधन विषयावर व्याख्यान



**नांदेड (प्रतिनिधी)**– एमजीएम ग्रंथालय आणि माहितीशास्त्र महाविद्यालयात एम.लीब.च्या विद्यार्थ्यांसाठी संशोधन कार्य करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी तज्ज्ञ प्राध्यापकांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी साधनव्यक्ती म्हणून स्वारातीम विद्यापीठाचे निवृत्त माहितीशास्त्रज्ञ रणजित धर्मापुरीकर यांची उपस्थिती होती. सर्वप्रथम महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. गोविंद हंबर्डे यांनी त्यांचे फुले आणि ग्रंथभेट देऊन स्वागत केले. यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांना परिचय करून दिला. तसेच व्याख्यान आयोजनामागील भूमिका स्पष्ट केली.

मार्गदर्शनपर व्याख्यानात धर्मापुरीकर यांनी ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विषयावर संशोधन संधी आणि प्रकार, संशोधनाची पुनरावृत्ती टाळण्यासाठीचे निकष, विषय निवडीचे निकष, संशोधन शीर्षक ठरविणे, उद्देश आणि गृहीतके ठरविणे, संशोधन आराखडा तयार करणे, साहित्य शोध, नोंद आणि रिव्ह्यू संकलीत साहित्याचा अभ्यास, प्रश्नावलीचे नियोजन, डेटा संकलन पद्धती, डेटा विश्लेषण आणि मांडणी, डेटा विश्लेषणानंतर प्राप्त तथ्यावर भाष्य तसेच सारांश आणि भविष्यात संशोधन विस्तार करण्यासाठी सूची आदींबाबत सखोल मार्गदर्शन केले. कार्यक्रमास प्रा. केदार रोकडे, गौरव देशमुख आणि डी.एच. शिंदे यांचे सहकार्य लाभले.

# भोकरमध्ये बोगस रक्त तपासणी लॅबचा सुळसुळाट; चौकशीसाठी तहसीलदारांना निवेदन

**भोकर (प्रतिनिधी)** –रुग्णांच्या उपचार प्रक्रियेत रक्त तपासणी अहवालांना अत्यंत महत्त्व असते. डॉक्टर पुढील उपचार हे या अहवालांच्या आधारे ठरवत असतात. मात्र भोकर शहरात काही जणांनी याचाच गैरफायदा घेत अनधिकृत पद्धतीने रक्त तपासणी लॅब सुरू करून बेकायदेशीर व्यवसाय सुरू केल्याचा आरोप केला जात आहे. या प्रकरणाची चौकशी करून संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी तहसीलदारांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.



भोकर शहरात अनेक ठिकाणी विनापरवाना पॅथॉलॉजी लॅब सुरू असल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे. एमबीबीएसनंतर एम.डी. (पॅथॉलॉजी) किंवा डीपीबी, डीसीपी, डीएनबी (पॅथॉलॉजी) यांसारखी आवश्यक पात्रता नसताना काही व्यक्ती रक्त व लघवी तपासणीचे नमुने घेऊन रिपोर्ट देत आहेत. काही ठिकाणी मोठ्या लॅबच्या नावाचा वापर करून अहवाल दिले जात असल्याचाही आरोप करण्यात आला आहे.

या प्रकारामुळे रुग्णांची फसवणूक होत असून त्यांच्या जीवाशी खेळ केला जात असल्याचे भालेराव यांनी म्हटले आहे. संबंधित विभागातील अधिकाऱ्यांनी याकडे तातडीने लक्ष देऊन अनधिकृत लॅबची तपासणी करावी व दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी सुभाष भालेराव यांच्यासह अनेकांनी केली आहे. लवकरात लवकर कारवाई न झाल्यास लोकशाही मार्गाने आमरण उपोषण करण्याचा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.

# शांताराम शेळके यांना जीवनगौरव पुरस्कार प्रदान



**हदगाव (प्रतिनिधी)**– महाराष्ट्र राज्य पेन्शनर असोसिएशन पुण्याच्या वतीने सेवानिवृत्त मुख्याध्यापक शांताराम शेळके यांना राज्यस्तरीय जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

हिंगोली जिल्ह्यातील नर्सी नामदेव येथे असोसिएशनच्या वतीने आयोजित कार्यक्रमात महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष एन. डी. मारणे आणि मराठवाडा विभागीय अध्यक्ष वसंत सबनीस यांच्या हस्ते राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करण्यात आला. शाल, पुष्पहार, सन्मानचिन्ह आणि मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

# चंदेरी



# तरुण पिढीला वृद्धांच्या कथेत रस नाही...

## इम्रान खानचे तीन खानांबद्दल सडेतोड वक्तव्य

बॉलीवूडचा तीन दशकांहून अधिक काळ नजरेखालून घातला तर अनेक कलाकार आले आणि गेले, परंतु बॉलीवूडचे खान - शाहरुख, सलमान आणि आमिर - हिंदी चित्रपटसृष्टीत नेहमीच स्थिर राहिले आहेत. एक काळ असा होता जेव्हा प्रेक्षक त्यांचे चित्रपट कोणत्याही प्रश्नाशिवाय पाहत असत, फक्त स्टार्सशी असलेल्या त्यांच्या नात्यामुळे. पण आता, सर्व काही बदलले आहे. आजकाल, प्रेक्षक चित्रपटाला नकार देण्याच्या बाबतीत खूपच स्पष्ट असतात, मग ते कितीही प्रमुख कलाकार असले तरी. आमिर खानचा पुतण्या इम्रान खानचा असा विश्वास आहे की या कलाकारांनी त्यांचे वय स्वीकारण्याची आणि त्यांच्या वयानुसार योग्य भूमिका घेण्याची वेळ आली आहे. तो म्हणाला, की एका विशिष्ट वयानंतर, तुम्ही मुख्य भूमिका साकारू शकत नाही...

इम्रान खान म्हणाला, की काही विशिष्ट वर्षे असतात जेव्हा तुम्ही मुख्य अभिनेता म्हणून काम करू शकता आणि नंतर असा क्षण येतो जेव्हा तुम्ही त्या भूमिका साकारण्यास सक्षम नसता. तिन्ही खान बंधू आता ६० वर्षांपेक्षा जास्त वयाचे आहेत. एक प्रेक्षक असतो जो तुम्हाला ओळखतो आणि तुमच्यासोबत वाढतो आणि नंतर एक नवीन, तरुण पिढी असते जी वय आणि अनुभवात त्यांच्या जवळच्या लोकांशी जोडू लागते. तो चित्रपट किंवा शो पाहतो तेव्हा सर्वात आधी कथा आणि पात्रांमध्ये स्वतःला पाहण्याचा प्रयत्न करतो. तरुण पिढीला ७० वर्षांच्या वृद्धाची कथा पहायची नाहीये.

### शाहरुख खान आणि आमिर खानचे चित्रपट

आपण अलीकडील बॉक्स ऑफिस ट्रेंडवर देखील चर्चा करू शकतो. झिरो नंतर, शाहरुख खानने चार वर्षांचा ब्रेक घेतला आणि पठाण आणि जवान या दोन मोठ्या ब्लॉकबस्टर चित्रपटांसह परतला. तथापि, त्याच वर्षी प्रदर्शित झालेला त्याचा तिसरा चित्रपट डंकी बॉक्स ऑफिसच्या अपेक्षा पूर्ण करू शकला नाही. त्याचप्रमाणे, आमिर खानचा लाल सिंग चड्ढा हा चित्रपट अयशस्वी झाला, तर सितारे जमीन पर ला समीक्षकांची प्रशंसा मिळाली, पण तिकीट खिडकीवर तो अपयशीच राहिला.

### 2018 नंतर सलमान खानची कारकीर्द मंदावली

दुसरीकडे, २०१८ पासून सलमान खानची कारकीर्द संघर्षांनी भरलेली आहे. त्याचे बहुतेक चित्रपट बॉक्स ऑफिसवरील अपेक्षा पूर्ण करू शकले नाहीत. टायगर ३ नंतर, जवळजवळ सर्वच चित्रपट फ्लॉप किंवा सरासरी ठरले आहेत.



## व्हॅलेंटाईन विकमुळे 'सैयारा' पुन्हा थिएटरमध्ये

जनरेशन झेडच्या मनावर बिंबलेला अहान पांडे आणि अनित पड्डा यांचा सैयारा हा चित्रपट गेल्या वर्षी २०२५ मध्ये प्रेक्षकांच्या भेटीला आला होता, तो पुन्हा एकदा थिएटरमध्ये दाखल झाला आहे. सध्या BookMyShow च्या शोटाइमवर विविध थिएटरमध्ये उपलब्ध आहे.

## भूमी पेडणेकरची विशेष मुलाखत

# सोशल मीडिया दलदल, गुंडगिरीला ट्रोलिंगचे लेबल!



**बॉलिवूडमध्ये महिलांच्या समस्यांवर बनवलेल्या चित्रपटांचा विचार केला तर अभिनेत्री भूमी पेडणेकरचे नाव प्रथम येते. भूमीने तिचा पहिला चित्रपट 'दम लगा के हैशा', त्यानंतर 'टॉयलेट एक प्रेम कथा', त्यानंतर 'शुभ मंगल सावधान', 'सांड की आंख', 'भीड' आणि 'भक्षक'मधून दमदार अभिनयाने प्रेक्षकांची मने जिंकली. ती सध्या तिच्या ओटीटी सिरीज 'दलदल'मुळे चर्चेत आहे. यात ती पोलीस अधिकारी रिटा फरेरा यांची भूमिका साकारते. मुंबईत जन्मलेली ३६ वर्षीय भूमी देखील एका राजकीय कुटुंबातून आलेली आहे. ती राज्याचे माजी गृहमंत्री दिवंगत सतीश पेडणेकर यांची मुलगी आहे. तिने या कौटुंबिक प्रभावाचा क्वचितच वापर केला. स्वतःचा मार्ग तयार करण्यावर विश्वास ठेवणाऱ्या भूमीने एका विशेष मुलाखतीत महिलांच्या समस्या, महिलाकेंद्रित चित्रपट आणि तिच्या वैयक्तिक आयुष्यातील आव्हानांबद्दल उघडपणाने सांगितले. आजच्या काळात सोशल मीडियावर होणाऱ्या ट्रोलिंगच्या समस्येबद्दलही तिने मत व्यक्त केले. सोशल मीडिया ट्रोलिंगचा केवळ सामनाच करावा लागला असे नाही, तर आपल्याला छळण्यात आल्याचे ती म्हणाली. ती असेही म्हणाली, की तिचा संयम संपला आहे. ती सोशल मीडियाचे वर्णन 'दलदल' असे करते. ती म्हणते की ते नकारात्मकतेने भरलेले आहे.**



**प्रश्न : तू नेहमीच महिलाकेंद्रित चित्रपट आणि समस्यांबद्दलच्या चर्चेत राहिली. महिलांबद्दल तुला सर्वात जास्त कोणती गोष्ट त्रास देते?**

» **भूमी :** सर्वात जास्त त्रास देणारी गोष्ट म्हणजे महिलांवरील हिंसाचार. हे एक घृणास्पद वास्तव आहे आणि ते सामान्य झालेय, इतके धक्कादायक आहे. कधीकधी मला अशा लोकांचे तोंड फोडावे वाटते. २०२६ मध्येही महिलांसोबत असेच घडत आहे. हे खूप निराशाजनक आणि संतापजनक आहे. महिलांवरील बलात्कार किंवा गुन्हे आपल्यासाठी नेहमीच बातम्या कशा असू शकतात? मला वाटत नाही की मी पडद्यावर किंवा पडद्याबाहेर या मुद्द्यांवर चर्चा करण्याची संधी गमावेन.

**प्रश्न : तुझ्या वेब सिरीजचे नाव 'दलदल' आहे. तू स्वतः अशा परिस्थितीत कधी सापडलीस?**

» **भूमी :** माझ्यासोबत असे दोनदा घडले. एकदा, जेव्हा माझे वडील दीर्घ आजाराशी झुंजत होते. माझे कुटुंब ते कसे बरे होतील, त्यांचे दुःख कसे कमी होईल याचा विचार करत दिवसरात्र घालवत होते. आता सोशल मीडियाचे हे जग मला दलदलीसारखे वाटते. मी सोशल मीडियावरील वागणुकीला कंटाळले आहे. सोशल मीडियावर इतकी नकारात्मकता, खोट्या बातम्या आणि ट्रोलिंग आहे की मी त्याचे वर्णनदेखील करू शकत नाही. या जगात काहीही खरे नाही. सर्व काही कृत्रिम आहे, तुम्हाला मिळणारी माहिती वास्तवापासून वेगळी आहे. मला वाटते की ही एक दलदल आहे ज्यातून बाहेर पडणे खूप कठीण आहे.

**प्रश्न : अलीकडेच तुला सोशल मीडियावर खूप ट्रोल केले गेले. तू अशा परिस्थितींना कसे सामोरे जाते?**

» **भूमी :** इतक्या मोठ्या प्रमाणात मतांना तोंड देण्याची ही पहिलीच वेळ होती. मला ते कसे हाताळायचे हे माहीत नव्हते. पण मी भाग्यवान आहे की अशा काळात माझे कुटुंब - माझी आई, माझी बहीण, माझे मित्र आणि मोठ्या संख्येने प्रियजन - माझ्यासाठी ढाल म्हणून उभे राहिले आणि दीर्घकाळात माझ्या मानसिक आरोग्यावर त्याचा परिणाम होणार नाही याची खात्री केली. पहा, मी याला ट्रोलिंग म्हणणार नाही, तर गुंडगिरी म्हणेन. आपण त्याला ट्रोलिंग असे लेबल लावतो, परंतु प्रत्यक्षात ते गुंडगिरी आहे. मी शाळेतही गुंडगिरीचा बळी ठरले होते. तथापि, एक सार्वजनिक व्यक्ती म्हणून, मी तुमच्या मतांसाठी खुली आहे, परंतु कृपया काही संवेदनशीलतेने तुमचे मत व्यक्त करा. जर तुम्ही म्हणाल, 'मला आशा आहे की तुम्ही मराल...' तर तुम्ही मला गुंडगिरी करत आहात. इंटरनेटवर होणारी छळवणूक शेअर करण्याऐवजी ती नाकारणे ही समाजाची सामूहिक जबाबदारी आहे, असे मला वाटते. आज तुम्ही ते पाहता, त्याचा आनंद घेता आणि नंतर ते आणखी शेअर करून त्यांना प्रोत्साहन देता. आज, प्रत्येकजण लाईक्स, शेअर्स आणि कमेंट्सच्या मागे धावत आहे. प्रत्येकाला मान्यता हवी आहे. जर तुम्हाला वाटत असेल की तुम्हाला या समस्येचा भाग व्हायचे नाही, कारण ते तुमच्यासोबत घडत नाही, तर ते खरे नाही. तुम्हीही बळी पडू शकता...

**प्रश्न : अलीकडेच ए.आर. रहमान यांच्या एका मुलाखतीने बरीच खळबळ उडवून दिली, सोशल मीडियावर खूप गोंधळ उडाला. तू विचारपूर्वक बोलते ना?**

» **भूमी :** मी माझे विचार व्यक्त करताना खूप सावध असते. ती मुलाखत मी पाहिलेली नाही. त्यामुळे त्यावर मी टिप्पणी करू शकत नाही. मात्र मी निश्चितपणे म्हणू शकते, की आजकाल गोष्टी अनेकदा वेगळा अर्थ निर्माण करण्यासाठी संपादित केल्या जातात. मला वाटते की इंटरनेटला दोन मिनिटांच्या हास्याचे किंवा मनोरंजनाचे एखाद्या व्यक्तीच्या वैयक्तिक जीवनावर होणारे गंभीर परिणाम कळत नाहीत. मी फक्त एवढेच म्हणेन की, अशा गोष्टींना प्रोत्साहन देऊ नका.

**प्रश्न : तुझी बहीण समिक्षासोबतचे तुझे नाते खूप घट्ट दिसते आणि तुझ्या जोडीचे अनेकदा कौतुक केले जाते. तू तुझ्या बहिणीबद्दल काय सांगशील?**

» **भूमी :** माझी बहीण माझ्या मुलीसारखी आहे. मी खूप भाग्यवान आहे की तिला मिळवले. ती माझी सर्वात चांगली मैत्रीण आहे आणि गरज पडल्यास ती माझी आई बनते. समिक्षा माझी सर्वात मोठी टीकाकार देखील आहे.

**प्रश्न : कारकिर्दीत तू दम लगा के हैशा, टॉयलेट एक प्रेम कथा आणि अफवाह सारखे अनेक अर्थपूर्ण चित्रपट केले आहेत. कोणत्या चित्रपटाचा आणि पात्राचा तुझ्यावर सर्वात जास्त प्रभाव पडला?**

» **भूमी :** माझ्या 'सोन चिरिया' या चित्रपटाचा माझ्यावर सर्वात जास्त प्रभाव पडला. त्या चित्रपटाने माझे आयुष्य अनेक प्रकारे बदलले. ती लहान मुलगी खुशी अजूनही माझ्या आयुष्याचा खूप मोठा भाग आहे. इतक्या लहान वयात मला मातृत्वाची अनुभूती मिळेल, असे मला कधीच वाटले नव्हते. २०१६ पासून मी खुशी ज्या आश्रमातून येते त्या आश्रमाशी जोडले गेले आहे. मला कल्पनाही नव्हती की आश्रमातील सर्व मुले माझ्या आयुष्याचा भाग होतील. हे घडून दहा वर्षे झाली आहेत. मला खूप आशीर्वाद मिळतात. त्यांच्याकडून मला खूप प्रेम मिळते. त्या चित्रपटाने माझ्या आयुष्याचा मार्ग बदलला. गेल्या दोन वर्षांत मी ज्या पद्धतीने अध्यात्माकडे वळले आहे, त्यामुळे माझ्यात शांती, समाधान आले आहे. बऱ्याचदा जेव्हा मी आरशात पाहते, तेव्हा असे वाटते की जणू काही ते म्हणत आहे की, आज तू खूप चमकत आहेस.

## वरुण शर्माची विशेष मुलाखत

# कृती सॅनन माझी खूप खास, तिची बहीणदेखील मैत्रीण



**पंजाबमधील जालंधर येथील एक ३५ वर्षांचा तरुण, त्याची स्वप्ने मोठी... त्याला त्या स्टार्ससोबत पडद्यावर काम करण्याची संधी मिळत आहे, ज्यांना तो फक्त मासिके आणि चित्रपटांमध्ये पाहत असे... पण हे एका रात्रीत घडले नाही. त्याला इंडस्ट्रीमध्ये येण्यासाठी आणि ओळख निर्माण करण्यासाठी बराच काळ संघर्ष करावा लागला. अखेर नशिबाने त्याला संधी दिली आणि २०१३ मध्ये प्रदर्शित झालेल्या त्याच्या पहिल्या चित्रपट 'फुकरे'ने त्याचे आयुष्य बदलून टाकले. १३ वर्षांनंतरही प्रेक्षक त्याला 'चुचा' म्हणून ओळखतात. हो, आपण अभिनेता वरुण शर्माबद्दल बोलत आहोत. त्याचा नुकताच नवीन चित्रपट 'राहू केतू' प्रदर्शित झाला आहे. विनोदी अभिनेता म्हणून वरुणचे प्रत्येक भूमिकेत कौतुक झाले आहे. त्याची विनोदी प्रतिमा इतकी मजबूत आहे, की खऱ्या आयुष्यात असो किंवा रील लाईफमध्ये त्याच्याकडून सर्वत्र विनोदाची अपेक्षा केली जात आहे. वरुण यावर खूश आहे. तो म्हणतो, की मला लोकांना हसवायला आवडते. लोक म्हणतात की मी टाइपकास्ट होईन, पण मी नेहमीच मनोरंजन करत राहण्याचा प्रयत्न करतो... खास मुलाखतीत वरुणने त्याच्या सुरुवातीच्या संघर्षमयी काळाबद्दल सांगितले. सध्याच्या काळात त्याला येणाऱ्या आव्हानांबद्दलही तो बोलला. आजकाल प्रत्येकजण माणसांपेक्षा एआयवर जास्त विश्वास ठेवतो, असेही त्याने एका विषयावर बोलताना सांगितले.**

### आईला फोन करून म्हणालो, माझे पैसे संपले आहेत...

आज वरुण शर्मासाठी भूमिका लिहिल्या जातात, पण त्याला सुरुवातीच्या काळात प्रचंड संघर्ष करावा लागला. तो सांगतो, की मी मूळचा जालंधरचा आहे. मी फक्त मासिकांमध्ये चित्रपट स्टार्स पाहिले होते. हे सर्व स्टार्स माझ्यासाठी आकाशातील ताऱ्यांसारखे होते. पण इथे आल्यानंतर बॉलीवूडने मला भरपूर संधी दिल्या. 'फुकरे'च्या आधी मी नाटकांमध्ये काम करायचो. मी कास्टिंग डायरेक्टर म्हणूनही काम केले आहे. सुरुवातीच्या काळात मला खूप नकारांचा सामना करावा लागला. एकदा मुख्य भूमिकेचे आश्वासन दिल्यानंतर ज्युनियर आर्टिस्ट म्हणून एक छोटी भूमिका मिळाली. ऑडिशन्सनंतर ऑडिशन्स येत असत आणि नंतर नकार येत असत. पुढच्या वेळी, पुढच्या वेळी... ऐकून मी कंटाळायचो. मग मी घरी परत येईन, असे आईला सांगायचो. आईला फोन करून म्हणायचो, माझ्याकडे पैसे संपले आहेत. कृपया मला काही पैसे पाठव. माझी आई पैसे पाठवायची, असे वरुण म्हणाला.



### कधीही टॉक्सिसिटीचा अनुभव घेतला नाही...

वरुण म्हणतो, की विनोदी कारकिर्दीची सुरुवात 'फुकरे'मधूनच केली. लोकांनी या पात्राला स्वीकारले आणि प्रेमाचा वर्षाव केला. दोन आणि तीन नायकांच्या चित्रपटांच्या युगात माझ्यासारख्या कलाकारांसाठी संधी निर्माण झाल्या. माझ्यासाठी भूमिका लिहिल्या जाऊ लागल्या. मी शाहरुख खान आणि काजोलसह अनेक मोठ्या निर्मिती संस्थांसोबत काम केले आहे. उद्योग माझे खूप स्वागत करत आहे. मला कधीही टॉक्सिसिटीचा अनुभव आला नाही.

### आईला वेळ देणे आयुष्यातील सर्वात मोठी गोष्ट

सर्वांना माहिती आहे की वरुणची आई त्याच्यासाठी सर्वात मोठी आधार प्रणाली राहिली आहे. तो स्पष्ट करतो, की कालांतराने मी माझ्या आयुष्यात आणि कारकिर्दीत एक धडा शिकलो आहे, जो मी अंमलात आणत आहेः तिच्याशी बोलणे किती महत्त्वाचे आहे, हे मी लक्षात घेतले आहे. आपण कुणाचाही फोन तपासला तर दिसेल की तुम्ही तुमच्या सहकाऱ्यांशी किंवा मित्रांशी आठ किंवा दहा मिनिटे बोललात, पण तुमच्या आईशी एक मिनिटही बोलला नाहीत. तुम्ही दिवसापासून एकदा तरी दूर असलेल्या आई, भावंड आणि कुटुंबातील सदस्यांसोबत कॉलवर बोलणे गरजेचे आहे. कारण त्यांच्या पाठिंब्याने आणि आशीर्वादाने तुम्ही इथपर्यंत पोहोचला आहात.

### कृती सॅनन ही वरुणची खास मैत्रीण, कुटुंबासारखी...

बॉलिवूडबद्दल अनेकदा असे म्हटले जाते की इथे कोणीही कोणाचा मित्र नाही. यावर वरुण म्हणतो, मी स्वतःला खूप भाग्यवान समजतो की मला इंडस्ट्रीमध्ये असे मित्र आहेत जे माझ्यासाठी खूप अर्थपूर्ण आहेत. पुलकित (सम्राट) हा असाच एक मित्र आहे, ज्याचे घर माझ्या घरापासून ४५ मिनिटांच्या अंतरावर आहे, पण तो फोन उचलण्यासाठी ४५ सेकंदही घेत नाही. मला माहीत आहे की पहाटे ३ वाजता मला पुलकितची गरज पडली तरी तो माझ्यासाठी तिथे असेल. पुलकित व्यतिरिक्त कृती सॅनन माझी खूप खास आणि चांगली मैत्रीण आहे. ती माझ्यासाठी कुटुंबासारखी आहे. फक्त तीच नाही तर तिची बहीणदेखील एक प्रिय मैत्रीण आहे. वरुण धवन माझा जवळचा मित्र आहे आणि मी आयुष शर्माच्याही खूप जवळचा आहे. सोनाक्षी सिन्हा आणि झहीर हेदेखील मित्र आहेत ज्यांच्यासोबत मी काहीही शेअर करू शकतो. कारकिर्दीत असे काही प्रसंग येतात किंवा आपले चित्रपट कधी बॉक्स ऑफिसवर चांगली कामगिरी करत नाहीत साहजिकच तुम्हाला दुःख होते. अशा परिस्थितीत इंडस्ट्रीतील तुमचे जवळचे मित्र तुमचे दुःख आणि वेदना समजू शकतात. म्हणून, इंडस्ट्रीत मैत्री होऊ शकत नाही ही खोटी समज आहे.

# रा.स्व.संघाच्या कार्यक्रमात पोहचला सलमान खान!



**मुंबई (प्रतिनिधी)** – जाज्वल्य आणि प्रखर हिंदुत्त्ववादी विचारसरणीसाठी ओळखल्या जाणाऱ्या आणि अखंड भारताचे स्वप्न उराशी बाळगून असणाऱ्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त मुंबईत एका भव्यदिव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. मुंबईतील नेहरु सेंटर येथे पुढील दोन दिवस राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त व्याख्यानमाला ठेवण्यात आली आहे. शनिवारी या व्याख्यानमालेचा शुभारंभ झाला. या उद्घाटनाच्या कार्यक्रमाला सुभाष घई, अश्विनी भावे, हेमा मालिनी यांच्यासह अनेक बॉलीवूड सेलिब्रिटी हजर होते. मात्र, या सगळ्यांमध्ये बॉलीवूड इंडस्ट्रीचा भाईजान म्हणजे सलमान खान आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या 'नवे क्षितिज' या व्याख्यानमालेसाठी बॉलीवूडमधील अनेक सेलिब्रिटी उपस्थित होते. मात्र, याठिकाणी सलमान खान आल्यानंतर सगळ्या कॅमेऱ्यांची तोंड एका झटक्यात त्याच्याकडे वळाली. सलमान खानभोवती अनेकांचा गराडा पडला. त्यामुळे एका अर्थाने राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या या कार्यक्रमात अभिनेता सलमान खान शो स्टॉपर ठरला.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने सुरू केलेल्या कार्याला १०० वर्षे पूर्ण झाली आहेत. डॉ. केशव बळीराव हेडगेवार यांनी स्थापित केलेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघात अनेक जण सहभागी झाले. हिंदू समाजाला संघटित, शिस्तबद्ध आणि बळकट बनवण्याच्या उद्देशाने या संघाची स्थापना करण्यात आली. या संघातील अनेक जणांनी यशाची उंची गाठली. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षाच्या निमित्ताने मुंबईमधील नेहरू सेंटरवर भव्य दिव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. 'नवे क्षितिज' या नावाने होणाऱ्या कार्यक्रमामध्ये आज सरसंघचालक मोहन भागवत यांचे व्याख्यान होत आहे. आजपासून पुढचे दोन दिवस व्याख्यानमाला होणार आहे. त्यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम होत आहे. तर, उद्या त्यांच्यासोबत प्रश्न उत्तरांचे सत्र पार पडेल अशी माहिती आहे. या विशेष कार्यक्रमात बॉलिवूड सेलिब्रिटी, खेळाडू यांच्यासह साधारण ९०० जणांना आमंत्रण देण्यात आलंय. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या भव्य दिव्य कार्यक्रमात अभिनेता सलमान खान, सुभाष घई, अश्विनी भावे, सुनील बर्वे आणि हेमा मालिनी अशा अनेक चित्रपट क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती पाहायला मिळाली. दरम्यान, सलमान खानची कार्यक्रमात एन्ट्री होताच उपस्थित मान्यवर तसेच कॅमेऱ्याची तोंड आपसुकच सलमान खानकडे वळाली. या कार्यक्रमात सलमान खानची उपस्थिती पाहून अनेकांच्या भुवया उंचावल्या.

# खेळाडूंना ५ टक्के आरक्षणाचा लाभ जलदगतीने मिळण्यासाठी ब्लॉकचेन तंत्रज्ञान वापरण्यास मान्यता

**मुंबई (प्रतिनिधी)** – गुणवत्ताधारक शासकीय व निमशासकीय सेवेमधील ५ टक्के आरक्षणाचा लाभ खेळाडूंना पारदर्शक, जलद व त्रुटीमुक्त पद्धतीने मिळावा, यासाठी ब्लॉकचेन व कृत्रिम बुद्धिमत्ता या अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर करण्यास शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने मान्यता दिली असल्याची माहिती जिल्हा क्रीडा अधिकारी रश्मी आंबेडकर यांनी दिली.

रश्मी आंबेडकर म्हणाल्या की, राज्य व राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांचे आयोजन करणाऱ्या सर्व अधिकृत एकविध क्रीडा संघटनांनी स्पर्धा संपल्यानंतर ७ दिवसांच्या आत स्पर्धेचा अंतिम निकाल, सहभागी खेळाडूंची यादी तसेच गुणपत्रिका अभिलेख जतनासाठी संचालनालयाकडे अपलोड करणे बंधनकारक आहे. ही सर्व माहिती संबंधित क्रीडा संघटनेच्या अधिकृत पदाधिकाऱ्यांनी डिजिटल स्वाक्षरीद्वारे प्रमाणित करणे आवश्यक आहे.



निर्धारित कालावधीत माहिती अपलोड न केल्यास संबंधित क्रीडा संघटनांचा डिफॉल्टर यादीत समावेश करण्यात येणार आहे. तसेच खेळाडूंनी आपले 'क्रीडा ई-प्रमाणपत्र' क्रीडा विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर अपलोड करणे आवश्यक आहे. दोन्ही बाजूंनी अपलोड करण्यात आलेल्या माहितीची ऑनलाईन पद्धतीने पडताळणी केली जाणार आहे.या नव्या प्रणालीमुळे खेळाडूंना पडताळणीसाठी प्रत्यक्ष विभागीय कार्यालयात येण्याची किंवा कागदपत्रे सादर करण्याची आवश्यकता भासणार नाही. त्यामुळे खेळाडूंना ५ टक्के आरक्षणाचा लाभ अधिक जलद व सुलभपणे मिळणार आहे.

यासाठी खेळाडू व संबंधित क्रीडा संघटनांनी क्रीडा विभागास पूर्ण सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी रश्मी आंबेडकर यांनी केले आहे.

# साताऱ्यात अजितदादा गटाच्या युवा नेत्यावर बिबट्याचा हल्ला, प्रचारासाठी जात असताना अंगावर झेपावला

**सातारा (प्रतिनिधी)** – ज्येष्ठ काँग्रेस नेते व माजी सहकार मंत्री स्वर्गीय विलासराव पाटील उंडाळकर यांच्या नातवावर बिबट्याने हल्ला केल्याची धक्कादायक घटना सातारा जिल्ह्यात घडली आहे. या हल्ल्यात अधिराज पाटील यांना पायाला दुखापत झाली असून, सध्या त्यांच्यावर स्थानिक ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

ही घटना साताऱ्याच्या कराड तालुक्यातील उंडाळेशेवाळवाडी मार्गावर शुक्रवारी रात्री साडेआठ वाजण्याच्या सुमारास घडली. अधिराज पाटील हे आपल्या सहकाऱ्यासोबत दुचाकीवरून प्रवास करत असताना अचानक रस्त्यावर दबा धरून बसलेल्या बिबट्याने त्यांच्यावर हल्ला चढवला. यावेळी दुचाकी चालवत असलेले धनाजी पाटील हे थोडक्यात बचावले.

अधिराज पाटील यांचे वडील उदयसिंह पाटील उंडाळकर हे येळगाव जिल्हा परिषद गटातून निवडणूक लढवत असून, ते राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) चे नेते आहेत. प्रचार आटोपून परतत असतानाच ही थरारक घटना घडल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. हल्ल्यानंतर स्थानिक नागरिकांच्या मदतीने अधिराज पाटील यांना तातडीने उंडाळे येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. सुदैवाने त्यांची प्रकृती सध्या स्थिर असल्याची माहिती डॉक्टरांनी दिली आहे. दरम्यान, उंडाळे आणि परिसरात बिबट्याचा वावर वाढत चालल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. सातत्याने होत असलेल्या मानवबिबट संघर्षाच्या घटनांमुळे बिबट्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी स्थानिकांकडून होत आहे.

# मालेगाव महापालिका इस्लाम पार्टीच्या ताब्यात, महापौरपदी शेख नसरीन बानो खालिद; उपमहापौरपद समाजवादी पार्टीकडे

**मालेगाव (प्रतिनिधी)** – मालेगाव महापालिकेच्या महापौरपदावर इस्लाम पार्टीच्या शेख नसरीन बानो खालिद यांनी दणदणीत विजय मिळवला आहे. महापौरपदासाठी झालेल्या थेट लढतीत शेख नसरीन बानो यांना एकूण ४३ मते मिळाली, तर शिवसेनेच्या उमेदवार लता सखाराम घोडके यांना १८ मतांवर समाधान मानावे लागले. त्यामुळे शेख नसरीन बानो यांनी २५ मतांच्या फरकाने विजय संपादन केला.

आज मालेगाव महापालिकेत महापौर आणि उपमहापौर पदासाठी निवडणूक प्रक्रिया पार पडली. या प्रक्रियेला जिल्हाधिकारी तथा पिठासीन अधिकारी आयुष प्रसाद यांच्या अध्यक्षतेखाली सुरुवात झाली. यावेळी महापालिका आयुक्त रवींद्र जाधव हेही उपस्थित होते. सभेची सुरुवात राष्ट्रगीताने झाले, तसेच दिवंगत अजित पवार यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

महापौरपदासाठी एकूण पाच नामनिर्देशन अर्ज दाखल झाले होते. तपासणीनंतर इस्लाम पार्टीच्या शेख नसरीन बानो खालिद, शेख ताहेरा शेख रशीद आणि शिवसेनेच्या लता सखाराम घोडके यांचे अर्ज वैध ठरवण्यात आले. माघारीसाठी देण्यात आलेल्या १५ मिनिटांच्या मुदतीत इस्लाम पार्टीच्या शेख ताहेरा शेख रशीद यांनी आपला अर्ज मागे घेतल्याने शेख नसरीन बानो आणि लता घोडके यांच्यात सरळ लढत झाली.

या निवडणुकीसाठी महापालिका सभागृहात इस्लाम पार्टीचे ३५, समाजवादी पार्टीचे ५, काँग्रेसचे ३, शिवसेनेचे १८, भाजपचे २ आणि एमआयएमचे २१ नगरसेवक उपस्थित होते. भाजप आणि एमआयएमने या निवडणुकीत तटस्थ भूमिका घेतल्याने सत्तासंघर्षाचा फायदा इस्लाम पार्टीला झाला.

मतदानानंतर झालेल्या मतमोजणीत इस्लाम पार्टीच्या शेख नसरीन बानो यांना समाजवादी पार्टी आणि काँग्रेसच्या पाठिंब्यासह ४३ मते मिळाली. शिवसेनेच्या लता सखाराम घोडके यांना केवळ १८ मते मिळाल्याने त्यांचा मोठ्या फरकाने पराभव झाला. मालेगाव महापालिकेच्या उपमहापौरपदावर समाजवादी पार्टीच्या शान-ए-हिंद यांनी दणदणीत विजय मिळवला आहे. झालेल्या थेट लढतीत शान-ए-हिंद यांना ४३ मते मिळाली, तर शिवसेनेचे ड. निलेश काकडे यांना १८ मतांवर समाधान मानावे लागले. उपमहापौरपदासाठी एकूण आठ नामनिर्देशन अर्ज दाखल झाले होते. तपासणीनंतर समाजवादी पार्टीचे शान-ए-हिंद, एमआयएमचे हाफिज अब्दुल्ला मुफ्ती इस्माईल, शिवसेनेचे नरेंद्र जगन्नाथ सोनवणे, निलेश काकडे तसेच समाजवादीचे मोहम्मद मुश्तकिन मोहम्मद मुस्तफा यांचे अर्ज वैध ठरले. माघारीच्या प्रक्रियेत एमआयएमचे हाफिज अब्दुल्ला मुफ्ती इस्माईल, समाजवादीचे मोहम्मद मुश्तकिन मोहम्मद मुस्तफा आणि शिवसेनेचे नरेंद्र सोनवणे यांनी अर्ज मागे घेतल्याने शान-ए-हिंद आणि शिवसेनेचे ॲड. निलेश काकडे यांच्यात सरळ लढत झाली.

# दहावी-बारावी परीक्षेपूर्वी पुणे प्रशासन 'ॲक्शन मोड'वर

## नियमांचे पालन न केल्यास होणार कडक कारवाई



**पुणे (प्रतिनिधी)** – पुढील काही दिवसांमध्ये राज्यात सर्वत्र परीक्षांचे वारे वाहू लागणार आहेत. बारावीच्या परीक्षा १० फेब्रुवारी ते ११ मार्च, तर दहावीच्या परीक्षा २० फेब्रुवारी ते १८ मार्च दरम्यान होणार आहेत. या परीक्षेत गैरप्रकार होऊ नये यासाठी पुणे प्रशासन ॲक्शन मोडवर आलं आहे. त्यांनी यावर्षी परीक्षेसाठी नवीन नियमावली केली असून ते नियम पळाले नही तर कडक कारवाई करण्यात येणार आहे.


नवीन नियमांनुसार; परीक्षा केंद्राच्या परिसरात १०० मीटर अंतरात अनधिकृत व्यक्तींना प्रवेश बंद करण्यात आला आहे. तसेच एका विद्यार्थी सोबत दोन किंवा अधिक व्यक्तींना एकत्र येण्यास बंदी घालण्यात आली आहे. याचबरोबर सार्वजनिक टेलिफोन, एसटीडी-आयएसडी बूथ, फॅक्स केंद्रे, झेरॉक्स सेंटर, ई-मेल सेंटर, इंटरनेट सुविधा, आणि कॅफे बंद ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

तसेच परीक्षा केंद्राच्या परिसरात आणि त्यासभोवतालच्या १०० मीटरच्या अंतरात मोबाईल फोन, वायरलेस सेट, ट्रान्झिस्टर, रेडिओ, कॅलक्युलेटर, लॅपटॉप यांसारखी साधने जवळ बाळगणे किंवा वापरण्यावर पूर्णपणे मनाई आहे. या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवर भारतीय दंड संहितेच्या कलम २२३ अंतर्गत कारवाई करण्यात येणार आहे.

# रिझर्व्ह बँकेचा मोठा निर्णय, रेपो रेटचा दर कायम; कर्जदारांना दिलासा नाही

**मुंबई (प्रतिनिधी)** – रिझर्व्ह बँकेने रेपो रेटमध्ये कोणताही बदल केलेला नाही. आरबीआय गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी शुक्रवारी रेपो रेट ५.२५ टक्के स्थिर ठेवण्याची घोषणा केली. आरबीआयच्या या निर्णयामुळे कर्जांवरील व्याजदरही तसेच राहतील आणि ग्राहकांना कोणताही दिलासा मिळणार नाही. रिझर्व्ह बँकेच्या चलनविषयक धोरण समितीने तटस्थ राहून आपली भूमिका कायम ठेवली आहे. म्हणजेच गरज पडल्यास आरबीआय भविष्यात व्याजदर कमी करण्यास किंवा वाढविण्यास तयार आहे. संजय मल्होत्रा म्हणाले की, अमेरिकेसोबतच्या व्यापार करारामुळे भारताच्या निर्यातीला मोठी चालना मिळेल.

पुढे बोलताना आरबीआय गव्हर्नर म्हणाले की, भारत अजूनही एफडीआयसाठी पसंतीचे ठिकाण आहे. भारताची अर्थव्यवस्था आणि वाढ सध्या मजबूत स्थितीत आहे. देशाची जीडीपी वाढ ७.४ टक्के होण्याच्या मार्गावर आहे. संजय मल्होत्रा यांनी सांगितले की, देशातील महागाई नियंत्रणात आहे. आर्थिक वर्ष २०२६ मध्ये देशातील किरकोळ महागाई दर २ टक्क्यांवरून २.१ टक्क्यांपर्यंत वाढला आहे. आरबीआयने चालू आर्थिक वर्षाच्या चौथ्या



तिमाहीसाठी महागाईचा अंदाज २.९ टक्क्यांवरून ३.२ टक्के केला आहे. आरबीआय गव्हर्नरने आर्थिक वर्ष २०२७ च्या पहिल्या तिमाहीसाठी महागाईचा अंदाज ३.९ टक्क्यांवरून ४ टक्के केला आहे. दुसऱ्या तिमाहीसाठी महागाईचा अंदाज ४ टक्क्यांवरून ४.२ टक्के करण्यात आला आहे.

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण समितीची बैठक नुकतीच संपली. या बैठकीत सर्वसामान्यांना काहीच फायदा झाला नाही. रेपो दरात काहीच कपात न झाल्याने एचख मध्ये कोणताही बदल होणार नाही. महागाईत सर्वसामान्यांना रेपो दर कमी होण्याची आशा होती. त्यामुळे व्याजदर कपातीचा फायदा त्यांना मिळाला असता. त्यांचा ईएमआय अजून काही रुपयांनी कमी झाला असता. मोठ्या गृहकर्जावरील ही व्याजदर कपात वर्षाकाठी मोठी ठरते. त्यामुळे ग्राहकांच्या खिशावरील ताण कमी होतो.

# बुरखा परिधान करून महिलांच्या डब्यात प्रवेश; महिलांना घाणेरडा स्पर्श

**मुंबई (प्रतिनिधी)** – मध्य रेल्वेच्या लोकल ट्रेनमध्ये महिला सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा गंभीर झाला आहे. एका धावत्या लोकलमध्ये महिलांसाठी राखीव असलेल्या डब्यात बुरखा परिधान केलेला एक संशयित पुरुष चढल्याने प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण पसरले. महिला प्रवाशांना त्या व्यक्तीच्या हालचालींवर संशय आल्याने त्यांनी त्याला जाब विचारण्यास सुरुवात केली आणि या संपूर्ण प्रकाराचा व्हिडिओ मोबाईलमध्ये कैद केला.

आपण पकडले जाणार हे लक्षात येताच, घाटकोपर स्थानक जवळ येत असताना त्या संशयिताने चालत्या ट्रेनमधून उडी मारली. इतक्यावरच न थांबता, त्याने रेल्वे रूळ ओलांडून विरुद्ध दिशेने जाणाऱ्या 'कर्जत फास्ट' लोकलमध्ये चढून पळ काढला. या घटनेमुळे रेल्वे पोलिसांच्या गस्तीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, महिला प्रवाशांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. एका संशयित व्यक्तीने बुरखा परिधान करून महिलांसाठी राखीव असलेल्या डब्यात प्रवेश केला. इतकेच नाही तर, बुरख्याचा आधार घेत त्याने डब्यातील महिला प्रवाशांना चुकीच्या पद्धतीने स्पर्श करण्याचा (विनयभंग) प्रयत्न केल्याने डब्यात खळबळ उडाली.


## पाहिजे

कुशल आय.टी.आय. इलेक्ट्रीशियन/मोटार वाईडींग अनुभव व तसेच आय.टी.आय. टर्नर ट्रेड अनुभव किमान ५ वर्षे असावा. कमीत कमी वेतन १५,०००/- रू.
इच्छुकांनी खालील पत्यावर संपर्क करावा.

**-: संपर्क पत्ता :-**
**उषा इलेक्ट्रीकल वर्क्स,**
**सिडको एम.आय.डी.सी. नांदेड**
**मो.नं. ९९६०१२८१९१**


## Change In Name

My Old Name is Manam Begum Sk. Imtiyaz which now I am changing as New Name Manam Begum Shaikh Imtiyaz Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.

Address -
Hamalpura, Nanded, Maharashtra
Mo.No. 8830705386


## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.



संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८


जे- / / 271 /२०26
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
नांदेड विभाग, नांदेड
दिनांक – 03/02/26

147/26 **चौकशीची जाहीर नोटीस**

अर्ज क्रमांक /२० कलम १९

सार्वजनिक न्यासाचे नांव : हसन फाऊंडेशन, नांदेड मा.जि.नांदेड

अर्जदार नांव : कोतवालकर शेख मकसूद शेख अहेमद

सर्व संबंधित लोकास या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त नांदेड, विभाग नांदेड हे वर नमुद केलेल्या अहवाल् अर्ज या संबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यावर चौकशी करणार आहेत.

१. वर नमुद केलेला सार्वजनिक न्यासा अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय?

२. खालील निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्यां मालकीचा आहे काय?
अ) जंगम मिळकत (वर्णन) : अर्जदार यांच्या कडे सभासद फी रुपये 1052/- जमा आहेत.
ब) सदर मिळकत (वर्णन) :

सदरच्या चौकशी प्रकरणामधे कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देण्याचा असेल त्यांनी त्याची लेखी कैफियत हि नोटीस प्रसिध्द झालेल्या तारखे पासून तीस दिवसाच्या आत या कार्यालयाच्या पत्यावर मिळेल अशा रितीने पाठविणे, त्यानंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास कांही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुर्ण केली जाईल व अर्जाच्या निकाला बाबत योग्य ते आदेश दिले जाईल.

ही नोटीस माझ्या सहिनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त नांदेड याचे शिक्यानिशी आज दिनांक 03/02/2026 रोजी दिली.

(श्रीराम बि. एन)
वरिष्ठ लिपिक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
नांदेड विभाग नांदेड

(श्रीमती पि. ज. रॉय)
(आधिक्षक)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
नांदेड विभाग नांदेड

१. दैनिक पेपर प्रसिध्दी करीता
२. कार्यालयीन नोटीस बोर्डावर

**दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, बिलोली.**
**श्री. ए.ए.के. शेख यांचे न्यायालयात**
**दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, बिलोली , जि.नांदेड.**

**नियमित दिवाणी दावा क्रमांक ३३१/२०२२**

**साक्षीदारास हजर राहण्यास फर्मावणारी उदघोषणा,**
**आज्ञावली १६ नियम १०**

**रामदास पि. पिराजी जाधव**
**विरुध्द**
**महाराष्ट्र शासन व ईतर.**

प्रति,
उप अधिक्षक
उप अधिक्षक भूमि अभिलेख कार्यालय धर्माबाद.
ता. धर्माबाद जि. नांदेड.

ज्याअर्थी , बजावणी करणा-या अधिका-यांची शपथेवर तपासणी घेतल्यानंतर असे दिसते की, समन्स रा. उप अधिक्षक , उप अधिक्षक कार्यालय , धर्माबाद साक्षीदारावर रितसर बजावण्यात आलेले आहे आणि ज्याअर्थी असे दिसते की, साक्षीदाराची साक्ष महत्वाची असून तो अशा समन्साचे अनुपालन करुन हजर राहण्यास चुकला आहे, म्हणून साक्षीदारास , **दिनांक १२/०२/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता** व त्या दिवसापासून जाण्याची परवानगी मिळेल त्या दिवसापर्यंत या न्यायालयामध्ये हजर राहण्यास फर्मावणारी हि उदघोषणा दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ आदेश १६ वा, नियम १० खाली काढण्यात येत आहे, आणि जर पूर्वोक्त दिवशी व वेळी हजर राहण्यास साक्षीदार चुकेल तर, कायद्यानुसार त्याचा परामर्श घेण्यात येईल.

आज ०३ फेब्रूवारी २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**टिप - साक्ष कामी सोबत येताना गट नंबर १०० मौजे नायगांव (ध) ता. धर्माबाद जि. नांदेड चे संबंधीत सर्व मुळ कागदपत्रे आणावीत.**
**पुढिल तारीख १२-०२-२०२६**

**दिवाणी न्यायाधीश व.स्तर,**
**बिलोली.**

**(जाहीर प्रगटन)**

**उम्मीद अधिनियम १९१५च्या कलम ६९ अन्वये वक्फ संस्थेच्या योग्य प्रशासनाकरिता योजना मंजूर करणेबाबत**

**वक्फ संस्थेचे नाव:** Masjid (Only Open Space for Construction)
**पत्ता. करंजी ता. हिमायतनगर जि. नांदेड**

उपरोक्त वक्फ संस्था महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळात नोंदणीकृत असुन अर्जदार पठाण अहेमदहुसेन अमीरखान व इतर (४) लोकांनी दि.१९/०१/२०२६ प्रमाणे सदर संस्थेच्या व्यवस्थापनाकरिता महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाकडे प्रारुप योजना दाखल केलेली आहे. प्रारुप योजनेतील तरतुदीनुसार विश्वस्तांचा कार्यकाळ ०५ वर्षांचा असून व्यवस्थापण समिती निवडीची रित निवडणुकीद्वारे अशी आहे. योजनेमध्ये नमूद प्रस्तावित समिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | पद |
|---|---|---|
| १) | पठाण अहमदहुसेन अमीर खान | अध्यक्ष |
| २) | आनवर अहमद हुसेन पठाण | सचिव |
| ३) | आरीफ अहमद हुसेन पठाण | खजिनदार |
| ४) | मुबानखाँ फकीरखाँ पठाण | सदस्य |
| ५) | शेख फकीरसाब ताजाहोन | सदस्य |

सदर प्रारूप योजनेबाबत काही तक्रारी, आक्षेप असल्यास संबंधिताना सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून (०८) दिवसाच्या आत जिल्हा वक्फ अधिकारी कार्यालय, नांदेड पत्ता मस्जिद जुनी ईदगाह, नांदेड येथे आपले म्हणणे लेखी स्वरुपात सादर करावे. विहीत वेळेनंतर आक्षेप प्राप्त झाल्यास त्याची दखल घेण्यात येणार नाही याची दक्षता घ्यावी.

**(मो. मोतासीम अन्सारी)**
**जिल्हा वक्फ अधिकारी,**
**नांदेड**

**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९७०१, ९८६०७२१३५६



# गोदातीर समाचार



**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308




# जिल्हा परिषद शाळांसाठी दहा टक्के आमदार निधी राखीव ठेवणार -आ. राजेश पवार

**उमरी (प्रतिनिधी)** –जिल्हा परिषद शाळांसाठी आमदार निधीतील दहा टक्के निधी राखीव ठेवणार असल्याचे अभिवचन आ. राजेश पवार यांनी दिले.

स्पर्धेच्या युगात जिल्हा परिषद शाळांकडे लक्ष देण्याची गरज आहे. श्रीमंतांच्या मुलांना शहर व जिल्ह्याच्या ठिकाणी खाजगी शाळेत शिक्षण घेता येते. परंतु गरिबांची मुले कोठे शिक्षण घ्यावीत? जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थी खूप गुणवत्ता अंगी असलेले, अभ्यासू, जिज्ञासू आणि होतकरू आहेत. त्यांना प्रोत्साहन देण्याची आवश्यकता आहे.

उमरी शिक्षण विभाग पंचायत समिती आणि गोदावरी शिक्षण संस्था तळेगावच्या संयुक्त विद्यमाने उमरी येथे पहिल्या तालुकास्तरीय नवरंग क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाचे गुरुवारी उद्घाटन करण्यात आले. यावेळी आ. पवार बोलत होते.

५ ते ७ फेब्रुवारी या तीन दिवसीय भरीव महोत्सवाचे उद्घाटन आमदार राजेश पवार यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गोदावरी शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. विक्रम देशमुख तळेगावकर हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून तहसीलदार मंजुषा भगत, गटशिक्षणाधिकारी



सतीश दर्शनवाड, बापूसाहेब कौडगावकर, माजी नगराध्यक्ष संजय कुलकर्णी, ज्ञानेश्वर पाटील सावंत, तालुका आरोग्य अधिकारी मोहन देवराये, ज्येष्ठ पत्रकार नरेंद्र येरावार, पशु वैद्यकीय अधिकारी डॉ. स्वप्नाली ढोक, गजानन माली पाटील, शाहीर जंटल, ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी राजू मुधोळकर, शंकर बेळकोणे आदींची व्यासपीठावर उपस्थिती होती. श्री संत ज्ञानेश्वर माऊली संगीत विद्यालयाचे शिक्षक ज्ञानेश्वर गायकवाड यांच्या संचाने स्वागतगीत सादर केले.

राज्यस्तरीय हलगीपटू, कलावंत शिक्षक माधव लिंबूरवाड यांच्या गोळेगाव शाळेतील विद्यार्थ्यांनी झांज, लेझीम पथकांनी कला सादर करून उपस्थितांची मने जिंकली. आमदार राजेश पवार यांनी प्रोत्साहनासाठी खेळाडूंना नऊ रंगांचा क्रीडा गणवेश दिला आहे. या रंगीबेरंगी गणवेशांमुळे उपस्थित विद्यार्थ्यांमध्ये महोत्सवात रंगत आणली होती. संपूर्ण कार्यक्रमाला या गणवेशामुळे वेगळा आयाम प्राप्त झाला आहे.

जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थी प्रत्येक क्षेत्रात अग्रेसर आहेत. त्यांना प्रोत्साहन मिळावे. तालुका, जिल्हा, राज्य व देश पातळीवरील स्पर्धेत सहभागी होता यावे, या दृष्टिकोनातून हा नवरंग महोत्सव आयोजित करण्यात आला.

या क्रीडा आणि सांस्कृतिक कार्यक्रमांना भरभरून प्रतिसाद मिळत आहे. याप्रसंगी उमरी तालुक्यातील सर्व केंद्रप्रमुख, सर्व शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षिका, पालक आणि जवळपास दोन हजार विद्यार्थी उपस्थित होते. उमरखेड येथील तरबेज शिक्षक परीक्षक म्हणून कामगिरी बजावत आहेत. मैदानी खेळात लांब उडी, खो-खो, कबड्डी, उंच उडी, लंगडी, धावणे तसेच इतर प्रकारांत कॅरम, वक्तृत्व स्पर्धा, गायन स्पर्धा आदी भरगच्च क्रीडा स्पर्धा होतील. यशस्वीतेसाठी पालक प्रबोधन मंच आणि जिल्हा परिषदेचे सर्व शिक्षकवृंद प्रयत्न करीत आहेत. समारोपाच्या दिवशी ७ फेब्रुवारी रोजी आमदार राजेश पवार, पुनमताई पवार यांच्यासह विविध मान्यवरांच्या उपस्थितीत या स्पर्धेत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांना पारितोषिक वितरण करण्यात येणार आहे.

हा कार्यक्रम उमरी तालुक्यात पहिल्यांदाच होत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळत असल्यामुळे पालकांनी समाधान व्यक्त केले आहे. प्रास्ताविक सतीश पाटील यांनी केले. सूत्रसंचालन डी. एम. कांबळे यांनी केले तर उपस्थितांचे आभार महेश टिप्रेसवार यांनी मानले.

प्रारंभी उपमुख्यमंत्री अजीत पवार यांना भावपूर्ण श्रध्दांजली वाहण्यात आली. पहिल्याच दिवशी क्रीडा महोत्सवास मोठा प्रतिसाद मिळाला.




**नांदेड** – शिख एज्युकेशन वेल्फेअर असोसिएशनच्या वतीने चार साहिबजादे यांच्या स्मरणार्थ आयोजित शिख युख फेस्टीव्हल स्पर्धांचे उद्घाटन गुरूद्वाराचे मुख्य जत्थेदार संतबाबा कुलवंतसिंघ व सहा. जत्थेदार भाई रामसिंघ यांचे हस्ते पार पडले. यावेळी आयोजक तथा शिख एज्यकेशन वेल्फेअर असोसिएशनचे अध्यक्ष जरनैलसिंघ गाडीवाले, गुरूद्वारा आयटीआय प्राचार्य स. गुरूबचनसिघ शिलेदार, डॉ. जगदीश कदम, राजकमलसिंघ गाडीवाले, नरेंद्रसिंघ चिरागिया, कुलप्रकाशसिंघ लिखारी, रघविरसिंघ बासरीवाले, खेमसिंग पुजारी, प्रेमजितकौर कोल्हापुरे, डॉ. भूपिंदरसिंघ मुनीम, उत्तमकौर कापसे, मितसिंघ मुनीम, तुलजेश यादव, हरप्रितसिंघ कपूर, गुरूप्रितकौर पेंटर, पवनजितसिंघ गाडीवाले आदी उपस्थित होते. **(छाया : करणसिंह बैस, नांदेड)**

# न्यायालयात चित्रीकरण केल्याप्रकरणी महिलेविरुद्ध गुन्हा दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)**– येथील न्याय दालनात मोबाईलद्वारे व्हीडीओ चित्रीकरण करत असलेल्या एका महिलेला रोखण्याचा प्रयत्न केला असता महिला पोलीस कर्मचाऱ्याला शिवीगाळ व मारहाण केल्याची घटना शनिवार, दि. ७ फेब्रुवारी रोजी दुपारी घडली आहे. या प्रकरणी त्या महिलेविरुद्ध वजिराबाद पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

नांदेडच्या प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी न्यायालयात मोबाईलद्वारे व्हीडीओ चित्रीकरण करत होती. न्यायालयाने संबंधित महिलेला चित्रीकरण थांबवण्याबाबत सूचना दिल्या. मात्र, त्या महिलेने न्यायालयाच्या सूचनांकडे दुर्लक्ष करत वाद घातल्याचे समोर आले आहे.

परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांना तसेच महिला पोलीस अंमलदारांना बोलावण्यात आले. त्यावेळी महिला पोलीस अंमलदार रूपाली मोरेश्वर भदे (नेमणूक शिवाजीनगर पोलीस ठाणे) यांनी संबंधित महिलेला न्यायालयाबाहेर जाण्यास सांगितले. न्यायालय न्यायदालनातून बाहेर गेल्यानंतर त्या महिलेने महिला पोलीस कर्मचाऱ्याला शिवीगाळ करत मारहाण केल्याचे सांगितले जात आहे. तसेच पोलिसांच्या गणवेशालाही हानी पोहोचेल, गणवेशाची बेअब्रू होईल अशा पद्धतीने वर्तन केल्याची तक्रार करण्यात आली आहे. या प्रकरणी महिला पोलीस कर्मचारी रूपाली मोरेश्वर भदे यांच्या फिर्यादीवरून वजिराबाद पोलीस ठाण्यात माधुरी अमोल कदम (वय ३८) या महिलेविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# प्रभाग क्रमांक १५ मध्ये साडेतीन कोटी रुपयांच्या विकास कामांचे आ. बोंढारकर यांच्याकडून भूमिपूजन



**नांदेड (प्रतिनिधी)**– नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघातील सराफा प्रभाग क्रमांक १५ मध्ये सार्वजनिक बांधकाम विभाग अंतर्गत सी. सी. रस्ता, नाली बांधकामासाठी तब्बल ३.५७ कोटी रुपयांच्या विविध विकास कामांचे आ. आनंदराव पाटील बोंढारकर यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले आहे.

यावेळी नगरसेविका निलम तुलजेश यादव, दीपक बोधने, पांडुरंग लोलगे, शंकर पिनोजी, दिलीप पेन्सिलवार, दीपक रोडा, शैलेश डोईफोडे, मधुकर टाक, सुधाकर टाक, दुर्गेश बागडे, बालाजी भायेगावकर, भानुदास लोलगे यांच्यासह गणेशराव मोरे, तुलजेश यादव आदींची उपस्थिती होती.

नांदेड दक्षिण भागातील विकास कामांसाठी आ. आनंदराव पाटील बोंढारकर यांचा सातत्याने पाठपुरावा सुरू राहिला आहे. पायाभूत मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ना. हेमंत पाटील यांच्या नेतृत्त्वाखाली त्यांच्याकडून सतत प्रयत्न सुरू आहेत. शहरी व ग्रामीण भागाच्या विकासाचा समतोल साधताना आ. बोंढारकर यांनी नांदेड दक्षिण भागातील विविध विकास कामांसाठी तीन कोटी ५७ लाख रुपयांचा निधी मंजूर करून घेतला आहे. या निधीतून केळी मार्केट चौक क्रशर रोड, बरकी चौक, दरबार मजीद ते किल्ला नाव घाटपर्यंत सी. सी. रोड आणि नाली बांधकाम करण्यात येणार आहे. या कामाचे भूमिपूजन नुकतेच पार पडले. भविष्यातही नांदेड दक्षिणमधील सर्वांगीण विकासासाठी आणि मूलभूत सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी निधीची कमतरता पडणार नाही, असा विश्वासही आ. बोंढारकर यांनी व्यक्त केला आहे.

# सिडको परिसरात माता रमाई आंबेडकर जयंती उत्साहात

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)**– माता रमाई आंबेडकर यांची जयंती सिडको परिसरातील अनेक भागात उत्साहात साजरी करण्यात आली तर सिडको परिसरातील रमाई आंबेडकर चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने ध्वजारोहणासह मिरवणूक व सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. तर नांदेड जिल्हा वंचित बहुजन आघाडींच्या वतीने रमाई आंबेडकर चौक व डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क सिडको येथे अभिवादन करून नवनिर्वाचित नगरसेवक यांचा विविध ठिकाणी सत्कार करण्यात आला.

माता रमाई आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीत अकरा ठिकाणी सार्वजनिक मिरवणूक व सकाळपासून परिसरात अनेक भागातील बौद्ध विहार या ठिकाणी ध्वजारोहण, अभिवादन सोहळा व नवनिर्वाचित लोकप्रतिनिधींचा सत्कार करण्यात आला. सकाळी रमाई आंबेडकर चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने सकाळी अध्यक्ष श्रीकांत नागणीकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

यावेळी उपाध्यक्ष प्रकाश कांबळे, सचिव राजीव वाघमारे, सहसचिव राजु तायडे यांच्यासह पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी माता रमाई यांच्या पुतळ्यास अभिवादन करण्यात आले तर दुपारी भीमवाडी ते माता रमाई आंबेडकर चौक येथे भव्य मिरवणूक काढण्यात आली होती, तर सायंकाळी सुप्रसिद्ध गायक रविराज भद्रे व गायिका अंकिता नांदेडकर यांच्या भीमगीतांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी नवनिर्वाचित लोकप्रतिनिधी संजय घोगरे पाटील, राजू लांडगे, संजय मोरे यांचा सत्कार करण्यात आला.

वंचित बहुजन आघाडी नांदेड दक्षिणच्या वतीने माता रमाई आंबेडकर चौक व डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क या ठिकाणी जिल्हाध्यक्ष शंकर महाजन, अमृत नरंगलकर, विठ्ठल गायकवाड, रवी पंडित, साहेबराव भालेराव, भीमराव बेंद्रीकर, महेंद्र सोनकांबळे, सुरेश गजभारे यांच्यासह पदाधिकारी यांनी अभिवादन केले. नवनिर्वाचित नगरसेवक संजय पाटील घोगरे, वैजनाथ देशमुख, नगरसेवक






प्रतिनिधी सतीश बसवदे, राजू लांडगे, संजय मोरे, माजी नगरसेविका डॉ. करूणा जमदाडे यांच्यासह सामाजिक कार्यकर्ते प्रसेनजित वाघमारे व समाज बांधवांनी परिसरातील नागलोक बुध्द विहार, नालंदा, जेतवन, सांची, नंदिग्राम, पंचशील, त्रिरत्न बौद्ध विहार येथे माता रमाई आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले तर उपस्थित नवनिर्वाचित लोकप्रतिनिधींचा सत्कार करण्यात आला.

ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीत असलेल्या वाघाळा, गोपाळचावडी, धनेगाव, बळीरामपूर, वसरणी, कौठा या ठिकाणी मिरवणूक आयोजित करण्यात आली होती. वसरणी येथील सुजाता बौध्द विहार येथे नगरसेविका सौ. दीपाली मोरे, सुलोचना धोंडीबाराव काकडे, अनुराधा राजू पाटील काळे, अभिषेक सौदे यांच्यासह पदाधिकारी व समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी जुना कौठा येथील अंजिठा बौध्द विहारातही माता रमाई आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले तर वाघाळा, शाहुनगर येथील मित्र मंडळाया वतीने मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले होते. जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली शहरात चोख बंदोबस्त लावला होता.

# एटीएम फोडण्याचा प्रयत्न करणारा चोरटा एलसीबीच्या जाळ्यात; भाग्यनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल



**नांदेड (प्रतिनिधी)**– शहरात व जिल्ह्यात एटीएम फोडणारा चोरटा स्थानिक गुन्हे शाखेच्या जाळ्यात अडकला. त्याला अटक करून भाग्यनगर पोलीस ठाण्यात त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांच्या सुचनेप्रमाणे पोलीस उपनिरीक्षक मिलिंद सोनकांबळे यांच्या पथकातील अंमलदार हे हद्दीत गस्त घालत होते. दि. ६ फेब्रुवारी रात्री २.१५ वाजताच्या सुमारास गोदावरी बँकेच्या बाजूस असलेल्या पंजाब नॅशनल बँकेच्या एटीएममध्ये नमूद आरोपी एटीएम मशीन उघडून त्यातील रोख रक्कम काढण्याचा प्रयत्न करताना सापडला. त्यास ताब्यात घेऊन त्याच्याकडे केलेल्या चौकशीत राम मोहन कुरे (वय २६ राहणार गागलेगाव ता. बिलोली, हल्ली मुक्काम श्रीनगर नांदेड) या आरोपीने परिसरातील कोटक महिंद्रा बँकेचे एटीएम मशीन देखील फोडल्याचे सांगितले. त्यामुळे सदर दोन्ही बँकेचे अधिकारी यांना घटनेबाबत कळवून संबंधित बँकेचे आस्थापना अधिकारी यांनी संबंधित एटीएमची पाहणी करुन ते फोडण्यात आल्याचे सांगितले.

पंजाब नॅशनल बँकेचे अधिकारी नितीन मिसाळ यांनी भाग्यनगर पोलीस ठाण्यात फिर्याद दिल्याने पो. स्टे. भाग्यनगर गु.र.न. ६८/२०२६ कलम ३२४(४),३३१(४),३०५,६२ इछड प्रमाणे व कोटक महिंद्रा बँकेचे अधिकारी दत्ता राजगोरे यांनी तक्रार दिल्याने पो. स्टे. भाग्यनगर प.ना.का. क्रमांक ६८/२०२६ कलम ३२४(४) प्रमाणे दाखल करण्यात आला आहे.

# धर्माबादची ईश्वरी मलपेल्लू सुवर्ण पदकाची मानकरी

**धर्माबाद (प्रतिनिधी)** – जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व जिल्हा क्रीडा परिषद अहिल्यानगर, अहिल्यानगर जिल्हा हाफ कीडो बॉक्सिंग असोसिएशन तसेच तायक्वान असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय हाफ कीडो बॉक्सिंग व राज्यस्तरीय तायक्वान क्रीडा स्पर्धा २०२५-२६ या दि. २ व ३ फेब्रुवारी रोजी अहिल्यानगर येथील महाराजा जीवाजीराव शिंदे महाविद्यालयाच्या क्रीडा संकुलात मोठ्या उत्साहात पार पडल्या.

या स्पर्धांचे उद्घाटन व आयोजन माजी आमदार बबनराव पाचपुते व माजी आमदार राहुलदादा



जगताप यांच्या अध्यक्षतेखाली, तर जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खरंगे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. राज्यातील विविध जिल्ह्यांतून आलेल्या खेळाडूंनी या स्पर्धेत सहभाग नोंदवला होता.

या अत्यंत चुरशीच्या स्पर्धांमध्ये धर्माबाद येथील गुरुकुल विद्यालयाची विद्यार्थिनी ईश्वरी श्रीनिवास मलपेल्लू हिने आपल्या उत्कृष्ट कामगिरीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. ४४ किलो वजनगटात 'लोभा (फाईट)' प्रकारात ईश्वरीने राज्यातून प्रथम क्रमांक पटकावत सुवर्णपदकाची मानकरी होण्याचा बहुमान मिळवला. विशेष म्हणजे, हाफ किडो बॉक्सिंग आणि तायक्वान या दोन्ही क्रीडा प्रकारांत तिने दमदार कामगिरी करत राष्ट्रीय पातळीवर खेळण्यासाठी पात्रता मिळवली आहे.

## नांदा सौख्यभरे

### पालीवाल-रावत

**नांदेड** – येथील रहिवासी लालसिंग पालीवाल व यामिनी पालीवाल यांचे नातू आणि डॉ. देवेंद्रसिंग व दीपाली पालीवाल यांचे चिरंजीव अभिजीत यांचा शुभविवाह मदनसिंग रावत व भगवती रावत यांची कन्या चि. सौ. कां. वैष्णवी हिजसमवेत नुकताच पार पडला. त्याप्रीत्यर्थ आज रविवार, दि. ८ फेब्रुवारी २०२६ रोजी आशीर्वाद गार्डन नांदेड येथे सायंकाळी ७.३० वाजता स्वागत समारंभ आयोजित करण्यात आला आहे. वधू-वरांस हार्दिक शुभेच्छा!

**-संपादक**

# अर्धापूर शहरात गजानन महाराज प्रगट दिनाचे आयोजन



**अर्धापूर (प्रतिनिधी)** – 'गण गण गणात बोते'च्या जयघोषात अर्धापूर येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही श्री संत गजानन महाराज यांचा २४ वा प्रगट दिन उत्सव मोठ्या उत्साहात साजरा होणार आहे. रविवार, दि.८ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या या सोहळ्यानिमित्त शहरात विविध धार्मिक व आध्यात्मिक कार्यक्रमांची जय्यत तयारी करण्यात आली आहे.

ग्रंथपठण व पालखी सोहळा उत्सवाची सुरुवात १ फेब्रुवारीपासून श्री गजानन विजय ग्रंथाच्या पारायणाने झाली असून, ह.भ.प. महालिंग स्वामी, ह.भ.प. सोमनाथ स्वामी हे पोथी वाचन करत आहेत. श्रीगजानन महाराज प्रगट दिनानिमित्त दुपारी ३ वाजता शहरातील प्रमुख मार्गावरून श्रींची भव्य पालखी मिरवणूक काढली जाणार आहे. श्रीगजानन महाराज मंदिर महात्मा फुले नगर येथे सोहळ्याचे विशेष आकर्षण म्हणजे सायंकाळी आयोजित करण्यात आलेले कीर्तन बालकीर्तनकार ह.भ.प. प्रज्योत महाराज मुधळे (अर्धापूरकर) आपल्या रसाळ वाणीने भक्तीचा जागर मांडणार आहेत. त्यांच्या कीर्तनानंतर सायंकाळी ६:०० वाजता आरती होईल आणि त्यानंतर ६:३० ते ८:०० या वेळेत भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास नागरिकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.




**नांदेड** – माता रमाबाई भीमराव आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे विधानसभा अध्यक्ष रोहन अरुण कांबळे व त्यांच्या मित्र परिवाराच्या वतीने राज कॉर्नर येथे अन्नदान करण्यात आले. यावेळी युवक जिल्हाध्यक्ष मोहसीन खान पठाण, स्वप्नील इंगळे पाटील, माणिक देशमुख तरोडेकर, सुरज सोणेकर, वेणू कांबळे, आशिष भास्करे, अभिजीत कांबळे, प्रितम कंधारे, सुशील खिल्लारे, राहुल लोंढे, बोधीपाल कंधारे, जीतन कांबळे, गजेश चौदंते, सुरत सदावर्ते, प्रतिक ढेंबरे, रोहित झोडगे, गंगाधर एंडर्गे आदी. **(छाया : करणसिंह बैस, नांदेड)**


**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४

ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com